परळी
# संघर्षनेता
समता, बंधुता, न्याय, अधिकारांचा नेता.
https://www.parlisangharshneta.in 9881265102 संपादक - मोहन व्हावळे
बीड | वर्ष- 11 वे | अंक क्र 79 | शनिवार दि. 04 एप्रिल 2026 | पृष्ठे 4 | किंमत 2 ₹ | RNI: MAHMAR/2016/67060

# अनुसूचित जातींचे उपवर्गीकरण म्हणजे नक्की काय?

## भाजपाचा खटाटोप नेमका कशासाठी?



भाजपाच्या नेतृत्वाखालील महायुती सरकारने या आठवड्याच्या सुरुवातीला अनुसूचित जाती उपवर्गीकरणाचा अभ्यास करण्यासाठी नवीन समिती स्थापन करण्याचा निर्णय घेतला. मंत्रिमंडळ बैठकीत हा विषय सादर झाल्यानंतर शिवसेना शिंदे गटाचे मंत्री संजय शिरसाट यांनी त्यावर अनेक प्रश्नचिन्ह उपस्थित केले. उपवर्गीकरणासंदर्भात राबविण्यात येत असलेल्या प्रक्रियेबाबत समाजात संतप्त भावना असल्याची भूमिका त्यांनी मांडली. त्याला प्रत्युत्तर देताना सांस्कृतिक कार्यमंत्री आशीष शेलार यांनी हे उपवर्गीकरण सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार होत असल्याचे स्पष्ट केले. यादरम्यान मित्रपक्षाचा विरोध असूनही भाजपाच्या या निर्णयामागे तीन महत्त्वाचे घटक कारणीभूत असल्याचे मानले जात आहे. त्याविषयीचा हा आढावा...सर्वोच्च न्यायालयाने अलीकडेच राज्यांना अनुसूचित जातींमध्ये उप-वर्गीकरण करण्याचे अधिकार बहाल केल्याने त्याबाबतचा कायदेशीर मार्ग मोकळा झाला आहे. दलित समुदायामधील विविध जातींना आरक्षणाचे फायदे समान प्रमाणात मिळत नसल्याची चिंता अनेक वर्षांपासून व्यक्त केली जात आहे. हे फायदे तळागाळातील प्रत्येक उपजातीपर्यंत पोहोचावेत, असा त्यामागचा मुख्य उद्देश आहे. दोन वर्षांपूर्वी झालेल्या लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रात भाजपाला मोठा फटका बसला होता. 2019 मध्ये 23 जागा जिंकणाऱ्या भाजपाचे संख्याबळ या निवडणुकीत केवळ नऊ जागांवरच आले होते. या पार्श्वभूमीवर दलित मतदारांच्या मतदानाच्या पद्धतीत झालेला बदल लक्षात घेऊन भाजपाने हा निर्णय घेतल्याचे राजकीय वर्तुळात मानले जात आहे. या समितीच्या अहवालावर आता राज्याचे आगामी राजकीय आणि सामाजिक समीकरण अवलंबून असणार आहे.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील मंत्रिमंडळाने स्थापन केलेल्या अनुसूचित जातींच्या उप-वर्गीकरणासंदर्भातील समितीचे नेतृत्व पान 3 वर

# शेतकऱ्यांच्या विरोधापुढे सरकार झुकलं, परभणी जिल्ह्यातला 'शक्तिपीठ'चा मार्ग बदलणार




जिल्ह्यातील सुपीक शेतीवरुन प्रस्तावित शक्तिपीठ महामार्ग नेण्याच्या निर्णयास शेतकऱ्यांनी तीव्र विरोध करत इंचभरही जमीन देणार नाही, असा ठाम पवित्रा घेतला होता. अखेर, या लढ्याला यश मिळाले असून राज्य शासनाने जिल्ह्यातील महामार्गाची आखणी बदलण्यास मान्यता दिली आहे. प्रस्तावित शक्तिपीठ महामार्ग वर्धा ते कोल्हापूर असा असून, तो राज्यातील 13 जिल्ह्यांतून जाणार आहे.यात परभणी व सोनपेठ तालुक्यातील मोठ्या प्रमाणावर शेती संपादनाची प्रक्रिया सुरु होती. सोनपेठ तालुक्यातील 10 गावांतील 1 हजार 242 शेतकऱ्यांची सुमारे 204 हेक्टर जमीन, तर परभणी तालुक्यातील 15 गावांतील 1 हजार 882 शेतकऱ्यांची तब्बल 407 हेक्टर जमीन संपादित करण्याचे नियोजन होते. मागील दीड ते दोन वर्षांपासून प्रशासनाकडून या प्रकल्पासाठी प्रयत्न सुरु होते. मात्र, आधीच समृद्धी महामार्गासाठी जमीन पान 3 वर

# आज ठळक

## एकनाथ शिंदेंचा अशोक खरातला 17 वेळा फोन, तटकरेंचा 8 वेळा अन् चाकणकर..., सुषमा अंधारेंनी सगळी कॉल हिस्ट्री बाहेर काढली



अशोक खरात प्रकरणात रोज नवे नवे खुलासे होत आहे. खरात शोषण केलेल्या महिलांकडून पोलिसांमध्ये तक्रार दाखल करण्यात येत आहे. त्याचे जमीनचे व्यवहार देखील तपासले जात आहेत. खरात हा राजकीय नेत्यांच्या संपर्कात होता हे देखील समोर आले आहे. आता शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांनी खरातच्या संपर्कात असलेल्या नेत्यांची कॉल हिस्ट्रीच बाहेर काढली.कुठल्या नेत्याने खरातशी कितीवेळा संपर्का केला. खरात त्याच्यासोबत किती वेळ बोलला याची माहिती अंधारे यांनी आपल्या सोशल मिडिया हँडलद्वारे दिली आहे. तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी 17कॉल आहेत. तर, शिंदे यांचे सर्वात जास्त संभाषण 21 मिनिटांचे आहेत, असे अंधारे यांनी म्हटले आहे.अशा व्यक्तीसोबत एकनाथ शिंदे यांचे 17 कॉल झाले आहेत (10 इनकमिंग आणि 7 आऊटगोईंग) तर ते कशा संदर्भात झाले आहेत ते त्यांनी सांगणं गरजेचं आहे.चंद्रकांत पाटील आणि सुनील तटकरे यांचे प्रत्येकी आठ कॉल आहेत. हे सगळे नॉर्मल कॉल आहेत व्हाट्सअप बद्दल माहिती नाही.', असे देखील त्यांनी म्हटले आहे.त्यांनी आपल्या पोस्टमध्ये पुढे म्हटले आहे की, 'व्हाट्सअपची माहिती मिळत नसते. आता समजा पाहायला गेलं तर सर्वाधिक संपर्क पान 3 वर

# रमेश मुंडे यांचे अल्पशा आजाराने निधन



वडवणी, प्रतिनिधी –

वडवणी येथील रहिवासी तथा राजाभाऊ मुंडे, बाबा मुंडे, दिलीप मुंडे,यांचे बंधू व बाबरी मुंडे यांचे चुलते तर कुणाल मुंडे यांचे वडील रमेश मुंडे (वय 55) यांचे दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनामुळे वडवणी परिसरात शोककळा पसरली आहे.

रमेश मुंडे हे शांत, मनमिळावू व सर्वसामान्यांशी जिव्हाळ्याचे संबंध ठेवणारे व्यक्तिमत्त्व म्हणून ओळखले जात होते. सामाजिक व धार्मिक कार्यात त्यांचा नेहमीच सहभाग राहिला होता. त्यांच्या जाण्याने समाजातील एक सेवाभावी व कर्तृत्ववान व्यक्ती हरपल्याची भावना व्यक्त होत आहे.

त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले,सुना,नातवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर आज दि. 03-04-2026 रोजी बाय सायं. 8 वाजता वैकुंठ धाम वडवणी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले असून अनेक मान्यवर व नागरिकांनी उपस्थित राहून त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.

परिसरातील विविध स्तरातून त्यांना श्रद्धांजली अर्पण केली जात असून त्यांच्या आत्म्यास शांती लाभो, अशी प्रार्थना व्यक्त केली जात आहे. मुंडे कुटुंबाच्या दुःखामध्ये दैनिक संघर्ष नेता परिवार सहभागी आहे.

## महादेव कोळी व मल्हार कोळी जमात बांधवांची व्यापक बैठक उत्साहात

# जातीचे प्रमाणपत्र आणि जात वैधता प्रमाणपत्र प्रक्रिया सुरळीत करण्याच्या मागणीसाठी लवकरच आंदोलन



## आंदोलनासाठी रूपरेषा आणि कोअर कमिटीची करण्याचा निर्णय

परळी वैजनाथ (प्रतिनिधी) मराठवाड्यातील महादेव कोळी, मल्हार कोळी जमातींना जातीचे प्रमाणपत्र आणि जात पडताळणी समित्याकडून महादेव कोळी, मल्हार कोळी जमातींना 2011 पूर्वीप्रमाणे मिळावेत आणि प्रक्रिया सुरु करण्याच्या मागणीसाठी लवकरच मराठवाडा स्तरावर भव्य आंदोलन करण्याचा निर्णय आज झालेल्या व्यापक बैठकीत घेण्यात आला. आंदोलनाचे स्वरूप आणि रूपरेषा ठरवण्यासाठी लवकरच कोर कमिटी स्थापन करण्याचेही या बैठकीत ठरले. परळीत झालेल्या विभागीय बैठकीला मराठवाड्याच्या सर्व तालुक्यातील प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

छत्रपती शिवाजी महाराज चौकातील शासकीय विश्रामगृहाच्या पान 3 वर

# बच्चू कडू यांच्यावर हत्येचा कट रचल्याप्रकरणी गुन्हा

- आमदाराच्या चुलत भावालाच संपवण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप



अमरावती: अचलपूर विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार बच्चू कडू यांच्यासह त्यांच्या दोन सहकाऱ्यांविरुद्ध चांदूरबाजार पोलीस ठाण्यात गंभीर गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे. विद्यमान आमदार प्रवीण तायडे यांचे चुलत बंधू अभिजीत तायडे यांना अपघाताचा बनाव करून जिवानिशी ठार मारण्याचा कट रचल्याचा खळबळजनक आरोप त्यांच्यावर ठेवण्यात पान 3 वर

# नागरिकांच्या दीर्घ प्रतीक्षेला पूर्णविराम : अंबेवेस येथे नव्या पुलाच्या बांधकामास ज्येष्ठ नागरिक यांच्या हस्ते प्रारंभ



परळी वैजनाथ (प्रतिनिधी): जुन्या गावभातील महत्त्वाचा वाहतूक दुवा असलेला पुल आता पुनर्निर्माण होणार आहे. अंबेवेस परिसरातील नागरिकांच्या अनेक वर्षांच्या मागणीला अखेर मूर्त स्वरुप प्राप्त झाले असून, नव्या पुलाच्या बांधकामाचा शुभारंभ आज या भागातील जेष्ठ नागरिक यांच्या हस्ते करण्यात आला. जनतेचे प्रतिनिधी म्हणून ज्येष्ठ नेते नारायणदेव गोपनपाळे यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून शुभारंभ झाला.जुन्या व अरुंद नळकांडी पुलामुळे नागरिकांना दररोज मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. विशेषतः पावसाळ्यात परिस्थिती अधिकच गंभीर होत असल्याने शालेय विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक, महिला व शेतकरी यांना मोठा त्रास सहन करावा लागत होता.

नवीन, प्रशस्त व सुरक्षित पुलासाठी नागरिकांकडून सातत्याने मागणी होत होती. या मागणीची दखल घेत राज्याचे माजी मंत्री आ. धनंजय मुंडे तसेच राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांच्या प्रयत्नांमुळे सन 2025-26 च्या वार्षिक जिल्हा योजना (DPDC) अंतर्गत या पुलासाठी 1 कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला.आज या पुलाच्या बांधकामाचा शुभारंभ या भागातील जेष्ठ व मान्यवर नागरिक यांच्या हस्ते पान 3 वर

## • नागरिकांनी पर्यायी रस्त्यांचा वापर करण्याचे आवाहन

दरम्यान अंबेवेस येथील पूलाला आता नवे रूप येणार असून नवीन पूलाच्या बांधकामासाठी या पुलावरून वाहतूक बंद राहणार आहे. त्यामुळे या पुलाच्या दोन्ही बाजूने असलेल्या पर्यायी रस्त्यांचा उपयोग नागरिकांनी बांधकाम पूर्ण होण्याच्या कालावधीत करावा व नगरपरिषदेला सहकार्य करावे असे आवाहन करण्यात आले आहे.

# राज्यातील शाळांची एकाच वेळी पटपडताळणी, दुसरी ते आठवीबरोबर नववी, अकरावीच्याही परीक्षा?



पुणे : राज्यातील शाळांची नियतकालिक मूल्यांकन चाचणीदरम्यान पटपडताळणी करण्यात येणार आहे. त्यानुसार 11 एप्रिल, 15 एप्रिल आणि 22 एप्रिल या दिवशी शिक्षण विभागाचे पथक शाळांना भेट देऊन विद्यार्थी उपस्थितीचा आढावा घेऊन त्याची प्रणालीमध्ये नोंद करणार आहे. पटपडताळणीची प्रक्रिया एकाच वेळी पूर्ण करण्यासाठी नववी आणि अकरावीच्या परीक्षाही याच दिवशी आयोजित करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

प्राथमिक शिक्षण संचालक शरद गोसावी, माध्यमिक शिक्षण संचालक डॉ. महेश पालकर यांनी या बाबत परिपत्रकाद्वारे सूचना दिल्या आहेत. राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेतर्फे पान 3 वर


# बीड सायबर पोलिसांची मोठी कारवाई; "डिजिटल अरेस्ट" फसवणूक प्रकरणातील 3 आरोपी अटकेत



परळी वैजनाथ : सायबर गुन्ह्यांवर आळा घालण्यासाठी बीड सायबर पोलिसांनी मोठी कारवाई करत "डिजिटल अरेस्ट"च्या नावाखाली नागरिकांची फसवणूक करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश केला. या प्रकरणातील तीन आरोपींना अटक करण्यात आली आहे. या गुन्ह्यात तब्बल 23 लाख 42 हजार 888 रुपयांची फसवणूक झाल्याचे तपासात उघड झाले आहे.

**या गुन्ह्यात तब्बल 23 लाख 42 हजार 888 रुपयांची फसवणूक झाल्याचे तपासात उघड**

सायबर पोलीस ठाणे, बीड येथे दाखल गुन्ह्यानुसार परळी वैजनाथ येथील तक्रारदार सूर्यकांत निवृत्ती मुंडे यांना "डिजिटल अरेस्ट"ची भीती दाखवून ऑनलाइन माध्यमातून मोठी रक्कम उकळण्यात आली होती. या प्रकरणी भारतीय न्यायसंहिता व माहिती तंत्रज्ञान पान 3 वर



# श्रध्दा उभी करते अंधश्रद्धा गुलाम बनवते

**➡ गणेश सावंत-9422742810**

देव आणि धर्माचा उच्चार झाला की हात जोडायचे, डोळे मिटायचे, विचार बंद करायचे हिच जर श्रद्धेची व्याख्या असेल तर समाजाने स्वत:ला फसवण्याची कला एक प्रकारे आत्मसातच केली म्हणा, कारण इतिहास पुन्हा पुन्हा दाखवतो, की देवाच्या नावाने सर्वात जास्त फसवला गेलेला घटक म्हणजे सामान्य माणूस. परंतू इतिहासाबरोबर आजच्या वर्तमानात सामान्यांसह स्वत:ला बुद्धीजीवी उच्चशिक्षित श्रीमंत गर्भश्रीमंत अधिकारी, पुढारी, मंत्री हे सुद्धा जेव्हा बाबा बुवॉच्या विळख्यात आडकतात तेव्हा आजची पिढी अंधश्रद्धेच्या काळोखात आणि धर्मांधतेच्या आगडोंबात अक्षरश: होरपळत आहे. या होरपळण्याचे चटके बसत असले तरी धर्मांधतेच्या नशेने आणि अंधश्रद्धेच्या काळोखाने त्याची जाणीव या लोकांना अद्याप होत नाही. असेच दिसते. श्रद्धा माणसाला उभारी देते परंतू अंधश्रद्धा माणसाला गुलाम बनवते आणि ही गुलामगिरी तलवारीने नाही तर भिती, चमत्कार आणि पाप पुण्याच्या कथांनी निर्माण केली जाते. प्रश्न विचारू नका, हा धर्माचा आदेश नसून सत्तेची यूक्ती आहे. हे समाजाने अजूनही ओळखले नाही. हे सर्वात मोठे दुर्दैव म्हणावे लागेल. देव काल होता, आज आहे आणि उद्याही राहिल. परंतू त्या देवाच्या नावाखाली जो ढोंगीपणा चालू आहे

ते ढोंग

आधी फोडले पाहिजे. भारतीय संत परंपरा आपण जर पाहिली तर त्यांनी देव नाकारला नाही परंतू देवाच्या नावावर चालणार्या ढोंगीपणावर उघडपणे आसूड ओढले. तथाकथीत ढोंगीबाबांना आणि धर्मांधतेला संतांनी अक्षरश: चाबकाने फोडले. जगद्गुरू संत तुकोबांनी बाह्य अडंबनावर प्रहार केला. संत कबीरांनी मंदिर-मस्जीद दोन्हीवरही प्रश्न उपस्थित केले. संत गाडगेबाबांनी लोकांसमोर उभे राहून स्पष्टपणे सांगितले. देव शोधायचा असेल तर माणसाची सेवा करा म्हणजेच खरी परंपरा प्रश्न विचारण्याची होती. आंधळेपणाची नव्हती. मात्र आज प्रश्न विचारणे म्हणजे महापाप होवून बसले आहे. सत्तेत प्रश्न विचारणं म्हणजे देशद्रोह होत आहे. ही जी परिस्थिती निर्माण केली गेली आहे ती अंधश्रद्धा वाढवण्यासाठी अधिक अधिक पोषक म्हणावी लागेल. इतिहासातील दाखले अधिक कठोर आहेत. युरोपमध्ये चर्चेच्या नावाखाली हजारो महिलांना जादूटोणा म्हणून जीवंत जाळले गेले. भारतात देवदासी प्रथेने धर्माचे अवरण घालून स्त्रीयांचे आयुष्य उद्धवस्त केले. समाज गप्प राहिला, कारण तेव्हा विरोध करणे म्हणजे देवाचा अपमान मानला गेला. आज अधुनिक काळात हे चित्र बदलले आहे का? आजीबात नाही. नाव बदलली, पोषाक बदलले परंतू पद्धत तिच राहिली. स्वत:ला अवतार घोषीत करणारे, चमत्कार दाखवणारे आणि भक्तांच्या भावनांचा बाजार मांडणारे तथाकथीत गुरू पुन्हा पुन्हा जन्म घेत राहिले. आसाराम बापु, गुरुमित रामरहिम यांच्यासारख्या प्रकरणांनी दाखवून दिले की भक्ती जेव्हा विवेकशुन्य होते तेव्हा अत्याचारालाही दैवी रंग दिला जातो. पिडीत व्यक्ती तक्रार करण्याऐवजी मौन बाळगते. कारण तिला देवाचा कोप होईल अशी भिती वाटते.

देव असोनिया देव
वृथा फिरतो निर्दैवं

साधू संतांनी देवाची व्याख्या सत्कर्मात केली आहे. ईश्वर भक्ती नामात केली आहे आणि स्वर्ग एकमेका सहाय्य करू अवघे धरू सुपंथ यात मानला गेला आहे. असे असतांना गुलामगिरीच्या मानसिकतेत असलेलो आम्ही पुन्हा पुन्हा बुवाबाजीच्या मानगडीत आडकून पडतो. देव आहे आणि तरी आम्ही। व्यर्थ हिंडे तिर्थग्रामी॥ नाभी मृगाची कस्तूरी। व्यर्थ हिंडे वनांतरी॥ साखरेचे मुळ ऊस। तैसे देही देव दिसे॥ तुकोबा म्हणतात, देव हा आपल्या शरीरात असतांना त्यासाठी अकारण अभाग्यासारखं कशाला हिंडतो, देव हा आपल्या आत असतो, त्याला भेटायला तिर्थक्षेत्राच्या ठिकाणी हिंडणं हा व्यर्थपणा आहे. कस्तूरी मृगाच्या नाभीत कस्तूरी असते. पण तो उगाचच जंगलात हिंडतो. लोणी हे दुधात असतं पण त्याला घुसळून काढायचं हे या मुर्खांना माहित नसतं. अरे मुर्खांनो, तुका सांगे मुढजना, देही देव का पहाना. एवढं सर्व सांगूनही वर्षानुवर्षे दशकूनदशकं धर्माचा बाजार इथं थांबत नाही. जेव्हा धर्म आणि राजकारणाची सांगड घातली जाते तेव्हा

'अंधश्रद्धा' बळकट

होते. हे सातत्याने पहावयास मिळत आहे. आज मितीला राज्यात आणि देशात राजकारण हे जात आणि धर्माशिवाय पुढे जात नाही. निवडणूका आल्या की मंदिर-मस्जीदचे प्रश्न उपस्थित होतात. लोकांच्या मुलभूत प्रश्नांकडे दुर्लक्ष केलं जातं. धर्माच्या नावावर, भक्तीच्या नावावर लोकांना एकमेकांसमोर शत्रू म्हणून उभं केलं जातं. इथंच धर्मांधता जेवढी वाढते तेवढेच नव्हे तर त्यापेक्षा अधिखतेने अंधश्रद्धेला बळ मिळते. प्रश्न विचारणारा इथं शत्रू ठरतो. विवेकवादी व्यक्ती धर्मद्रोही ठरते आणि समाज भितीच्या चौकटीत कैद होतो अशा वातावरणात सत्य नव्हे तर भावना राज्य करु लागते आणि जेव्हा भावना राज्य करण्याच्या मुडमध्ये असते तेव्हा राज्यकर्ते लोकांच्या त्या भावनेला सहजतेने कटपूतली बनवतात. दुर्दैवं याचं वाटतं हा महाराष्ट्र विचारवंतांचा महाराष्ट्र, साधूसंतांचा, सूफींचा, समाजसुधारकांचा हा महाराष्ट्र. महात्मा ज्योतीराव फुलेंनी शिक्षणाला शस्त्र म्हटले. कारण शिक्षण प्रश्न विचारायला शिकवतो. शिक्षण हे वाघीणीचं दुध आहे असं डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी म्हटलं, कारण शिक्षण असेल तर तो प्रश्न विचारेलच. त्यापुढे जात आंबेडकरांनी बुद्धीप्रामाण्याचा आग्रह धरला. त्यामागेही समाज गुलाम राहणार नाही हेच होतं. राजाराम मोहनराय यांनी सतीप्रथा मोडीत काढली. कारण धर्माच्या नावाने अन्याय स्विकारणे हे सर्वात मोठे पाप आहे. एवढे सर्व किंवा या पेक्षा अधिकतेने सत्य घडामोडी तुमच्या आमच्याकडे असतांना आजही आम्ही धर्माच्या नावावर, श्रद्धेच्या नावावर लुबाडले जातो. तेव्हा आजचा

समाज विचाराने
नागवा आणि खोकला

आहे. असे स्पष्टपणे म्हणावे लागेल. अशोक खरातसारखा शिकल्या सवरलेला भामटा धर्माच्या आड आणि भक्ती श्रद्धेच्या भयवल्लीत समाजाला अक्षरश: नागवं करून टाकतो. इथे काहींनी प्रश्न उपस्थित केले. त्या महिलांना कळत नव्हतं का? त्या महिला तेव्हा काही झोपल्या होत्या का? तो बाबा थोडंच त्यांच्याकडे गेला, त्यांच्यावर बळजबरी केली? होय, हे प्रश्न साहजिक उपस्थित होतील. परंतू जेव्हा धर्मांधता, भक्ती भाव श्रद्धा आणि भावना अंगात शिनते तेव्हा व्यक्तीचा विवेक हा संपुष्टात येतो. त्या महिलांना दोष देण्यापेक्षा त्या बाबाला उभारी देणारे जे कोणी उच्च शिक्षित असतील ते खरे यात दोषी. आणि त्यापेक्षाही कमी श्रमामध्ये ज्याला सूख शोधायचंय तो यात सर्वात दोषी, सुख कशाला म्हणायचं? साधन संपत्ती, श्रीमंती की बेडवरची रासलिला? इथं सुख कोणी बिर्याणीत शोधतं तर कोणी साध्या वडापावमध्ये समाधानी होतं. परंतू सुखाची व्याख्या हि जर स्वत: नागवे होत दुसर्याला नागवे करत असं कोणी मांडत असेल तर समाजाच्या प्रत्येक नागरीकांनी नागवं होणार्या त्या बुवा बाबाचं बुटाणी तोंड फोडायला हवं. परंतू ती ताकद तेव्हाच येईल, समाजाने नागवंपण आणि खोकलंपण सोडलं तर. जोपर्यंत श्रद्धा विवेकासोबत राहत नाही तोपर्यंत धर्माचा बाजार तेजीत राहिल आणि भक्तीचा वापर व्यापारासाठी होत राहिल. परिवर्तनाची सुरूवात मंदिर-मस्जीद किंवा चर्चमधून नाही तर माणसाच्या विचारातून होणार आहे. मंदिर मस्जीद चर्च गुरुद्वार शुद्ध मनाने, शुद्ध चित्ताने नास्मरण करण्याहेतू लिन होणं एवढ्यासाठी असावेत.

# घर, शाळा आणि राष्ट्रीय शिक्षण धोरण!

**लेखकः डॉ. भारत कऱ्हाड**



आपलं घर नेमकं कसं आहे, हा प्रश्न आपण स्वतःला कधी प्रामाणिकपणे विचारतो का? अनेकदा आपण सहज म्हणतो—"घर म्हणजे शाळा." पण थोडं वास्तवात पाहिलं, तर अनेक घरं ही दोन टोकांमध्ये झुलताना दिसतात—कधी "सरकारी शाळा", तर कधी "विनाअनुदानित शाळा". आणि या दोन्हींच्या अनुभवातूनच मुलं आपलं आयुष्य घडवत असतात. त्यामुळे घरातील वातावरण समजून घेताना या दोन प्रकारांची तुलना थोड्या विनोदी, पण तितक्याच विचारप्रवर्तक पद्धतीने करणे आवश्यक वाटते.

"सरकारी शाळा" म्हटलं की आपल्या डोळ्यासमोर एक चित्र उभं राहतं—ठरलेली पद्धत, काही प्रमाणात शिस्त, सगळ्यांसाठी समान नियम आणि एक प्रकारची स्थिरता. घरात जर आई-वडील एकमताने निर्णय घेत असतील, एकमेकांचा आदर करत असतील आणि मुलांसमोर एकसंध भूमिका ठेवत असतील, तर ते घर म्हणजे अगदी सरकारी शाळेसारखं—व्यवस्थित, सुसूत्र आणि विश्वासार्ह. मुलांना अशा घरात स्पष्टता मिळते. त्यांना कळतं—काय योग्य, काय अयोग्य, कोणाचं ऐकायचं आणि कसं वागायचं. नियम बदलले तरी ते समजावून सांगितले जातात आणि त्यामागे एक विचार असतो.

आता "विनाअनुदानित शाळा"कडे वळूया. इथे सगळं थोडं लवचिक, थोडं गोंधळलेलं आणि कधी कधी थोडं राजकीयही असतं. नियम असतात, पण परिस्थितीनुसार बदलतात. घरात जर आई एक सांगते आणि वडील दुसरंच सांगतात, आई रागावते आणि वडील लगेच मुलाची बाजू घेतात, किंवा उलट घडतं, तर ते घर अगदी विनाअनुदानित शाळेचं वातावरण तयार करतं. मुलं लगेच ओळखतात—"इथे नियम स्थिर नाहीत... योग्य वेळी योग्य व्यक्तीकडे गेलं की काम होतं!" आणि मग त्यांच्या वर्तनातही लवचिकता नव्हे, तर चतुराई वाढू लागते. सरकारी शाळेत शिक्षकांमध्ये समन्वय असतो; विनाअनुदानित शाळेत कधी कधी गट तयार होतात. घरातही तसंच चित्र दिसू लागतं—"आई गट" आणि "बाबा गट". मुलं परिस्थितीनुसार बाजू बदलतात. आई रागावली की मुलगा बाबांकडे धाव घेतो—"बाबा, आई मला ओरडते!" बाबा म्हणतात—"अगं, लहान आहे!" दुसऱ्या दिवशी बाबा रागावले की मुलगा आईकडे! या सगळ्या प्रक्रियेत मुलं नकळत एक महत्त्वाचा धडा शिकतात—नियम पाळण्यापेक्षा परिस्थिती हाताळणं महत्त्वाचं! आणि इथूनच घरातलं "राजकारणशास्त्र" सुरू होतं.

यात भर म्हणजे नवीन राष्ट्रीय शिक्षण धोरण. ते सांगतं—शिक्षण सर्वांगीण असावं, समजून घेण्यावर भर असावा, कौशल्यांना महत्त्व द्यावं. ऐकायला खूप छान! पण घरात जर आधीच विनाअनुदानित शाळेचं वातावरण असेल, तर हे धोरण मुलांच्या हातात एक नवीन साधन बनतं.

उदाहरणार्थ, "रट्टा मारू नका" या तत्त्वाचा अर्थ मुलं लगेच काढतात—"गुणाकार का करायचा? त्यामागचं तत्त्व सांगा." आई थोडी गोंधळते, वडील शांत बसतात आणि मुलगा मनात म्हणतो—"आजचा अभ्यास वाचला!" म्हणजे समजून घेण्याच्या नावाखाली अभ्यासापासून सुटका!

"खेळ आणि अभ्यास दोन्ही महत्त्वाचे" या तत्त्वामुळे घरात एक नवीन समीकरण तयार होतं. मुलगा पुस्तक उघडतो, दोन मिनिटांनी क्रिकेट खेळायला जातो आणि आई विचारते—"अभ्यास?" उत्तर येतं—"हा सर्वांगीण विकास आहे!" वडील लगेच पाठिंबा देतात. आईला मात्र जाणवतं—विकास होतोय की अभ्यास टळतोय?

कौशल्य शिक्षणावर भर दिल्यामुळे घरात काही वेगळ्याच घटना घडतात. आई म्हणते—"भाजी चिरायला मदत कर," आणि मुलगा अभिमानाने म्हणतो—"हा माझा कौशल्य विकास!" पण जेव्हा भांडी धुवायला सांगितली जातात, तेव्हा उत्तर तयार—"हे माझ्या अभ्यासक्रमात नाही!" म्हणजे शिक्षणाचं धोरण स्वीकारायचं, पण आपल्या सोयीने!

नवीन मूल्यांकन पद्धतीनुसार फक्त गुण नाहीत, तर सर्वांगीण मूल्यांकन असतं. घरात जर रिपोर्ट कार्ड बनवलं, तर त्यात लिहिलं जाईल—अभ्यास: 65%, मोबाईल वापर: 100%, आईला प्रश्न विचारणे: उत्कृष्ट, बाबांना पटवणे: A+, आणि शेवटची टिप्पणी—"विद्यार्थी अत्यंत हुशार आहे—नियम तयार करण्यापेक्षा त्यातून मार्ग काढण्यातच पारंगत!" हे वाचून आई-बाबा दोघेही क्षणभर थांबून विचारात पडतात.या सगळ्या विनोदी चित्रामागे एक गंभीर सत्य दडलेलं आहे. घरात जर "सरकारी शाळेसारखी" सुसूत्रता, स्पष्टता आणि परस्पर आदर असेल, तर कोणतंही शिक्षण धोरण प्रभावी ठरतं. पण घरात जर "विनाअनुदानित शाळेचं राजकारण" सुरू असेल, तर कोणतंही धोरण मर्यादित ठरतं. मुलं शेवटी पुस्तकांपेक्षा जास्त शिकतात ती घरातील वातावरणातून—आई-वडिलांच्या वर्तनातून, त्यांच्या संवादातून आणि त्यांच्या निर्णयांमधून.

म्हणूनच प्रश्न शिक्षण धोरणाचा नाही, तर घरातील वातावरणाचा आहे. घरात जर एकसंधता, समन्वय आणि परस्पर सन्मान असेल, तर ते घर "आदर्श विद्यालय" बनतं. अन्यथा ते "विनाअनुदानित शाळा" बनून राहतं—जिथे नियम असतात, पण त्यांची दिशा नसते.शेवटी, इतकंच सांगावंसं वाटतं—घर हीच खरी शाळा आहे. फरक इतकाच की इथे फी नसते, पण शिकवण आयुष्यभर पुरते. त्यामुळे प्रत्येक पालकाने स्वतःला विचारावं—आपलं घर मुलांसाठी कोणती शाळा आहे?

घर जसं, तसं शिक्षण; आणि शिक्षण जसं, तसं मुलांचं भविष्य!

**डॉ. भारत कऱ्हाड**
**प्राचार्य, वराडकर महाविद्यालय, दापोली**
**जिल्हा रत्नागिरी**

# गाजर शास्त्रीय नावः डॉकस कॅरोटा सॅटायव्हा

**➡ (4-10 एप्रिल: आंतरराष्ट्रीय गाजर दिवस सप्ताह विशेष.)**

दरवर्षी 4 एप्रिल रोजी जगभरात साजरा केला जातो. सन 2003 पासून सुरु झालेला हा दिवस, गाजराचे आरोग्यदायी फायदे, त्यातील पोषक घटक (उदा. बीटा-कॅरोटीन, व्हिटॅमिन A) आणि विविध पाककृतींबाबत जागरूकता पसरवण्यासाठी साजरा केला जातो. गाजर खाण्याचे महत्त्व सांगून लोकांच्या जीवनशैलीत सुधारणा करणे हा यामागचा मुख्य उद्देश आहे. सदर महत्त्वपूर्ण संकलित माहिती श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरुजी प्रस्तुत करताहेत... संपादक.

गाजर ही द्विवर्षायू वनस्पती एपिएसी कुलातील असून तिचे शास्त्रीय नाव डॉकस कॅरोटा सॅटायव्हा आहे. डॉकस कॅरोटा या रानटी जातीची निवडक निपज करून सॅटायव्हा ही उपजाती विकसित केली गेली आहे. हिचे मूलस्थान अफगाणिस्तान असावे, असा एक अंदाज आहे. तेथून ती यूरोप आणि आशियात स्थिरावली. पूर्वीच्या काळी सुगंधी पाने आणि बियांसाठी ही वनस्पती वाढविली जात असे. भाजीकरिता जे खाल्ले जाते ते गाजर या वनस्पतीचे सोटमूळ असते. खाल्ल्या जाणार्या गाजराचा आकार, चव आणि पोत सुधारावा म्हणून सॅटायव्हा हा प्रकार विकसित केला गेला आहे.

गाजर वनस्पतीचे विविध भाग:

गाजराचे झुडूप 1-1.5 मी. उंचीपर्यंत वाढते. खोड सरळ व शाखायुक्त असते. सोटमूळ जाडजूड, मांसल आणि शंकूसारखे असून रंगाने शेंदरी, लालसर वा पिवळसर आणि 10-30 सेंमी. लांब असते. पाने रेखीय भाल्यासारखी असतात. फुले लहान, पांढरी किंवा पिवळसर असून छत्रीसारख्या फुलोर्यात येतात. फळे लांबट गोल असून त्यावर केसाळ कंगोरे असतात.

गाजराची मुळे गोड, पाचक, भूक वाढविणारी, पोटदुखी, बद्धकोष्ठता इत्यादींवर गुणकारी असतात. गाजरात अ, ब आणि क ही जीवनसत्त्वे आणि शर्करा व लोह असतात. बीटा-कॅरोटीन या घटकामुळे गाजराला शेंदरी व लालसर रंग आलेला आहे. मानवी आतड्यात बीटा-कॅरोटीनच्या चयापचयातून 'अ' जीवनसत्त्व तयार होते. तंतुमय पदार्थ, प्रतिऑक्सिडीकारक आणि खनिजे यांकरिता गाजरे एक महत्त्वाचे स्त्रोत आहेत. ती कच्ची किंवा उकडून खातात. गाजराचे भारतात देशी, परदेशी, नान्टेस, स्कार्लेट, हॉर्न, डॅन्व्हर्स, ऑक्सहार्ट असे अनेक उपप्रकार आहेत. उपप्रकारांनुसार गाजरात आकारमान, रंग व चव यांबाबतींत विविधता आढळते. लाल रंगाची गाजरे भारतीयांना तर पिवळसर तांबूस रंगाची गाजरे पाश्चात्यांना आवडतात. लागवड केलेल्या गाजराचे दोन मुख्य प्रकार खालीलप्रमाणे करता येतात- (1) पूर्वेकडील गाजरे :दहाव्या शतकात किंवा त्यानंतर मध्य आशियात, सध्याच्या अफगाणिस्तानात या वनस्पतीची लागवड करण्यात आली, असा एक अंदाज आहे. या गाजरांचे नमुने पाहिले, तर ही गाजरे रंगाने जांभळी किंवा पिवळी असतात. तसेच यांच्या मुळांना शाखा फुटलेल्या असतात. अँथोसायनिन या रंगद्रव्यामुळे या गाजरांना जांभळा रंग प्राप्त होतो.(2) पश्चिमेकडील गाजरे: सतराव्या शतकाच्या सुमारास नेदर्लंड्समध्ये नारिंगी रंगाची गाजरे निर्माण केली गेली. कॅरोटीन या रंगद्रव्यामुळे या प्रकारच्या गाजरांना नारिंगी रंग प्राप्त होतो. पाश्चिमात्य देशांत ही गाजरे सामान्यपणे आढळत असली, तरी या देशांमध्ये पांढर्या, पिवळ्या, लाल आणि जांभळ्या रंगांच्या गाजरांचीही लागवड केली जाते.

गाजराच्या उत्पादनात अमेरिकेची संयुक्त संस्थाने, रशिया आणि चीन हे देश आघाडीवर आहेत.

गाजराच्या संशोधनातून नवनवीन प्रकार निर्माण केले जात आहेत. एका प्रकारच्या गाजरात नारिंगी रंगद्रव्याचा अभाव असून ते पांढर्या रंगाचे असते. या प्रकारचे गाजर ई जीवनसत्त्वाने समृद्ध असते. (विविध समाज माध्यमांवरुन सविनय साभार जी.)

!! जागतिक गाजर दिवसाच्या सर्वांना हार्दिक हार्दिक शुभेच्छा जी !!

**- संकलन व सुलेखन -**
**श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरुजी.**
**( दिनविशेषकार)**
**रा. एकता चौक, रामनगर वॉर्ड, गडचिरोली.**
**फक्त चलभाष: 9699836717.**

# सोमेश्वर साथीतुन जनतेसी नाती जोडणारे : संपादक बालासाहेबजी फड

आज आपली घरं मुकी व्हायला लागली आहेत.घरात पूर्वीसारखा संवाद उरलेला नाही.बाप एका दरवाजावाटे घरात आला तर मुलगा दुसऱ्या दरवाजावाटे बाहेर जातो.घराची धर्मशाळा झाली आहे,घराचे रेस्ट हाऊस झाले आहे,घराची वेटींग रुम झाली आहे.माणसांचे नाते आता फेसबुक व व्हाट्सअप वरुनच जोपासल्या जात आहेत म्हणून एक कवी असे म्हणतो की

विज्ञानाच्या यूगात केवढी मोठी चूक।
आता रक्तांच्या ही नात्यांना लागते फेसबुक ॥

नात्यात कृत्रिमता वाढत चालली असून अशा काळात नाते संबंध सांभाळने,जोपासने हे मोठे जिकीरीचे काम बनले आहे.अस्या ही काळात आपल्या कार्याशी प्रामाणिक राहून जनतेसी नाते जोडता येऊ शकते याचे उत्कृष्ट उदाहरण म्हणजे सोमेश्वर साथी हे वृतपत्राचे संपादक बालासाहेब फड होत.जे या वृत्तपत्राच्या माध्यमातून नाती जोडण्याचे व जपण्याचे प्रामाणिक काम करत आहेत.अस्या या नात्यांनी श्रीमंत असलेल्या संपादक बालासाहेब फड यांचा आज 04 एप्रिल हा जन्मदिवस.त्यानिमित्ताने त्यांच्या जीवनचरित्राचा घेतलेला हा संक्षिप्त आढावा.

भारत हा विविधतेने नटलेला देश आहे.या देशाला फार प्राचीन परंपरा लाभलेली आहे.हा देश एकेकाळी सोने की चिडिया म्हणून ओळखला जात होता.येथे नालंदा,तक्षशिला सारखे विद्यापीठे होती. "राजा स्वदेश पूजन्ते । विद्वान सर्वत्र पुजन्ते" असा विचार प्रामुख्याने मांडला जात होता.नंतर या देशावर परकीयांनी आक्रमणे केली व या देशाला लुटले.त्यातच राजेशाहीचा जन्म झाला.छत्रपती शिवरायां सारखे मोजके राजे सोडले तर अनेक राजांनी जनतेची पिळवणूक केली.नंतर देशावर दीडशे वर्षे इंग्रजांनी राज्य केले.त्यांनी भारतीय जनतेचा अनन्वित छळ केला.अशातही काही सुधारणा ही आणल्या. तदनंतरच्या कार्यकाळात 15 ऑगस्ट 1947 ला देशाला स्वातंत्र्य मिळाले पण लोकांची खरी प्रगती करावयाची असेल तर लोकशाही शिवाय पर्याय नाही हे लक्षात घेऊन येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर व अन्य विद्वानांनी संसदीय लोकशाहीचा स्वीकार केला. तीला बळकट बनविण्याचे काम हे प्रसारमाध्यमे करताहेत.आज प्रसार माध्यमात ही विविधता आली आहे.पण त्यात प्रिंट मिडीयाची प्रामाणिकता सर्वांपेक्षा अधिक आहे.



संपादक बालासाहेब फड यांचा जन्म 04 एप्रील 1974 रोजी आई गंगाबाई व वडिल सिताराम यांच्या पोटी बारा ज्योतिर्लिंगापैकी एक असलेल्या वैद्यनाथाच्या शेजारी असलेल्या कन्हेरवाडी ता.परळी जि.बीड येथे झाला.त्यांना बालपणापासुन प्रभू वैद्यनाथ व संत जगमित्र नागा, सोमेश्वर यांचा आशीर्वाद लाभला. घरात अनेक पिढ्यांपासून वारकरी संप्रदायाचे वातावरण असल्यामुळे कीर्तन,नामस्मरण व श्रवणभक्ती घडली व या अनुषंगाने चौफेर ज्ञान प्राप्त करता आले.ते स्वतः वारकरी संप्रदायाचे अनुयायी आहेत.सांप्रदायावर त्यांचा जीव आहे. त्यांनी आपल्या ह.भ.प. बालकिर्तनकार प्रकाश महाराज फड नावाच्या मुलाला वयाच्या सातव्या वर्षी ज्ञानाई गुरुकुल सेलू येथे वारकरी संप्रदायाचे शिक्षण घेण्यासाठी ठेवले. त्यांचे चिरंजीव या वयात अभ्यासू व उत्तम कीर्तन करतात.तसेच त्यांचे दुसरे चिरंजीव इंजीनियरिंग संग्राम बालासाहेब फड करत आहेत .या पुर्वी म्हटल्या प्रमाणे वृत्तपत्र व्यवसाय हा सतीचे वाण आहे.कारण या व्यवसायात बातमी लावताना हजारदा विचार करावा लागतो.बातमीची सत्यता असावी,स्पष्टता असावी,सदरक्षणाय खलनिग्रहणाय हे साध्य व्हावे. पद,पैसा,तोंड पाहून न लिहिता जे सत्य आहे ते लिहावे लागते.

तोफ मुकाबील हो तो अकबार निकालो।
असे या साठीच म्हटले जाते.

ही सगळी वैशिष्ट्ये संपादकाला पाळावी लागतात.एखादी चुकीची बातमी लागली तर त्याची खूप मोठी किंमत संपादकाला सोसावी लागते हे एक प्रकारचे अग्निदिव्यच आहे. पण हे अग्निदिव्य संपादक बालासाहेब फड हे 1995 पासून सांभाळत आहेत.त्यांनी साप्ताहिक परळी संदेश या पासून ते हे काम करत आहेत.ना कुठला या क्षेत्रातला वारसा ना भरगच्च पाठीमागे संपत्ती पण प्रामाणिकतेच्या जोरावर हे कार्य ते पार पाडताना दिसतात.संत तुकाराम महाराजांनी म्हटल्याप्रमाणे

असाध्य ते साध्य करिता सायास।

या न्यायाप्रमाणे त्यांनी ही असाध्य काम साध्य केले आहे.या साप्ताहिक काम करत करत 2016 पासून सोमेश्वर साथी या दैनिकाचा प्रारंभ केला आहे.या दैनिकाच्या माध्यमातून त्यांनी अनेक नवोदितांना लेखन मंच उपलब्ध करून दिला आहे. अनेक क्षेत्रातील लोकांसी नाती जोडण्याचे काम करत आहेत.मी ही असाच जोडला गेलो म्हणुन त्यांच्या वाढदिवसाला लिहीण्याचा मोह होतो.आमचे अनेक लेख त्यांनी छापून आम्हाला लिहिते करण्याचे काम ते करतात. एवढेच नाही तर समाजात चांगुलपणा पेरण्याचं काम करणाऱ्या गुणवंतांचा या वृत्तपत्राच्या मार्फत वर्धापन दिनाला पुरस्कार देऊन सन्मानही करतात.चांगल्या कार्याला प्रबलन देण्याचं काम ते सतत करत आले आहेत.यासाठी स्वतःचे मन मोठे असावे लागते.जगाला ज्यांच्या कार्य कर्तुत्वाचा अभिमान वाटतो त्या शिवरायांच्या जन्मोत्सवाच्या निमित्ताने हा कार्यक्रम घडवून आणतात. त्याशिवाय अशा गोष्टी करता येत नाहीत.हेच यातून दिसून येते.

भले तरी देऊ कासेची लंगोटी।
नाठाळाचे माथी हाणू काठी।

ही भूमिका त्यांची दिसते.वारकरी संप्रदायाची प्रत्येक घडामोड आवर्जून आपल्या वृत्तपत्रात घेतात.


त्यांच्या अंतकरणात आपणास मदत करणा-यांबद्दल सतत कृतज्ञता दिसते.

.मा. श्री.किरण गित्ते साहेब IAS सचिव त्रिपुरा सरकार , विवेकानंद यूथ वेलफेअर सोसायटीच्या अध्यक्षा मा.सौ.उषाताई किरण गित्ते त्यांच्याप्रती ते नेहमी आभार व्यक्त करतात.वारकरी संप्रदायातील अनेक गायक,वादक,कीर्तनकार हे त्यांचे अत्यंत जवळचे मित्र आहेत. त्यांना आई-वडिलांचे आई गंगाबाई वडील सितारामजी यांचे सुरुवातीपासून सहकार्य लाभले. दोन भाऊ तसे दोन मुलांचे ही सहकार्य लाभत आले आहे. संपादक म्हटले की समाजसेवेसाठी खूप वेळ द्यावा लागतो अशा वेळेस घर सांभाळणारी व समजून घेणारी पत्नी महत्त्वाचे असते 2002 साली लग्न झाले तेव्हापासून मुलांची व परिवाराची सर्वाधिक काळजी त्यांच्या सौभाग्यवती सौ. ज्ञानेश्वरी बालासाहेब फड या घेत आहेत.त्यांच्या बद्दलही ते भरभरुन सांगतात.वारकरी संप्रदायातील अनेक महाराज मंडळी वरती लेख ते नेहमीच आपल्या वृत्तपत्रात छापतात. महापुरुषांच्या व कार्यकर्तृत्व गाजवणाऱ्या राजकीय नेत्यांच्या वरती ही ते नेहमीच आपल्या वृत्तपत्रातून भरभरुन लिहताना दिसतात.

त्यांच्या कार्याची दखल घेवुन त्यांची महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या परळी तालुकाध्यक्ष पदी निवड झाली.त्यांना आतापर्यंत अनेक पुरस्कारांनी गौरविण्यात आले आहे.ही पुरस्काराची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे.

अस्या पत्रकारीतेसी प्रामाणीक राहुन नाते जोडणा-या व जपणा-या संपादक मा.बालासाहेब फड यांना आज वाढदिवसा निमित्त मनःपूर्वक शुभेच्छा देतो व त्यांच्याकडून भविष्यातही असेच नाते जोडण्याचे काम वृत्तपत्रीय माध्यमातुन घडत राहो अशी ईश्वर चरणी अपेक्षा व्यक्त करुन त्यांना दीर्घ आयू आरोग्य चिंतुन मी माझे लेखन थांबवतो.

**प्रा.डॉ.रामकृष्ण बदने**
**ग्रामीण महाविद्यालय,वसंतनगर**
**ता.मुखेड जि.नांदेड**
**भ्रमणध्वनी -9423437215**



हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक मोहन भागुजीराव व्हावळे यांनी मातोश्री ऑफसेट मोंढा जवळ, परळी वैजनाथ, परळी ता. परळी, जि.बीड 431515 (महाराष्ट्र ) येथे छापून साप्ताहिक परळी संघर्षनेता, कार्यालय, मोहन भागुजीराव व्हावळे, इंदिरा नगर ता. परळी वैजनाथ जि.बीड पिन कोड 431515 (एम.एस.) येथे प्रकाशित केले आहे. मोबा. 9881265102, पीआरबी ॲक्ट नुसार या अंकातील प्रकाशित झालेल्या मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. या संबंधीत वाद परळी वैजनाथ न्यायालया अंतर्गत parlisangharshneta@gmail.com , mohanvhavale1111@gmail.com

## पान 1 वरुन

मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांच्याकडे देण्यात आले आहे. या समितीला अवघ्या एका महिन्यात अहवाल सादर करण्यास सांगण्यात आले आहे. यापूर्वी निवृत्त न्यायाधीश अनंत मनोहर बदर यांच्या अध्यक्षतेखालील समितीने आपला अहवाल सादर केला होता. 2024 च्या विधानसभा निवडणुकीच्या काही दिवस आधी तत्कालीन एकनाथ शिंदे सरकारने या समितीची स्थापना केली होती. सर्वोच्च न्यायालयाने राज्यांना अनुसूचित जातींमध्ये उप-वर्गीकरण करण्याची परवानगी दिल्यानंतर, त्याचा मसुदा तयार करणे आणि इतर राज्यांमधील मॉडेल्सचा अभ्यास करण्याची जबाबदारी बदर समितीवर होती. आता नवीन समिती विविध अनुसूचित जाती गटांकडून आलेल्या हरकती, मागण्या आणि निवेदनांची सखोल तपासणी करणार आहे. धोरणात्मक निर्णय घेण्यापूर्वीची ही अंतिम सल्लागार प्रक्रिया मानली जात आहे. अनुसूचित जातींच्या उपवर्गीकरणाला सोप्या भाषेत 'आरक्षणांतर्गत आरक्षण', असे म्हटले जाते. त्याद्वारे विद्यमान आरक्षण कायम ठेवून, त्याचे वेगवेगळ्या जातीच्या गटांमध्ये विभाजन केले जाते. लोकसंख्या, सामाजिक मागासलेपणा आणि संधींची उपलब्धता या निकषांवर या आरक्षणाची विभागणी होते. या मागणीमागे असा युक्तिवाद आहे की, तुलनेने सक्षम आणि संघटित गट जसे की, नवबौद्ध दलितांना आरक्षणाचा अधिक लाभ मिळत आहे. त्या तुलनेने मातंग समाजासारखे इतर छोटे आणि अधिक मागासलेले घटक अजूनही मागासलेलेच आहेत. आरक्षणाचा फायदा सर्वांना समान मिळावा हा उप-वर्गीकरणामागचा मुख्य हेतू असल्याचे सांगितले जात आहे. मात्र, ही संकल्पना तितकीच वादग्रस्तही ठरत आहे. टीकाकारांच्या मते, यामुळे दलित समाजात फूट पडू शकते आणि त्यांची एकत्रित राजकीय ताकद कमी होण्याचा धोका निर्माण होऊ शकतो.महाराष्ट्राच्या राजकारणात दलित समुदायाची भूमिका अत्यंत निर्णायक मानली जाते. 2011 च्या जनगणनेनुसार, राज्यातील अनुसूचित जाती समुदायातील संख्या सुमारे 1.32 कोटी असून, ती एकूण लोकसंख्येच्या 11.81 टक्के आहे. विशेष बाब म्हणजे या समुदायात 59 पेक्षा जास्त विविध जातींचा समावेश असून, हा वर्ग सामाजिक आणि राजकीयदृष्ट्या विभागलेला आहे. राज्यातील दलित समुदाय हा एकसंध नसून,, त्यात मोठी विविधता दिसून येते. त्यातील मोठा घटक म्हणजे आंबेडकरी चळवळीचे अनुयायी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांनी प्रेरित आहे. प्रामुख्याने महार समाजाने समतेच्या विचारातून बौद्ध धर्म स्वीकारला आहे. दलितांच्या लोकसंख्येत नवबौद्धांचा सुमारे 40 टक्के वाटा असून, त्यांचे राजकारण प्रामुख्याने सामाजिक न्याय आणि सक्षमीकरणावर केंद्रित आहे. या वर्गाची भूमिका नेहमीच भाजपा आणि एकसंध शिवसेनेच्या विरोधात राहिलेली आहे. दुसरीकडे भाजपाला पारंपरिकपणे मातंग समाजासारख्या लहान दलित उपजातींचा पाठिंबा मिळत आला आहे.2024 च्या लोकसभा निवडणुकीत भाजपाच्या नेतृत्वाखालील महायुतीला 48 पैकी केवळ 17 जागांवरच विजय मिळाला होता; तर काँग्रेसच्या नेतृत्वाखालील महाविकास आघाडीने 30 हून अधिक जागा आपल्या पदरात पाडून घेतल्या. महाराष्ट्रासारख्या राज्यात मोठी पीछेहाट होणे हा भाजपासाठी मोठा धक्का मानला गेला. या निवडणुकीत आंबेडकरी दलित मतदारांनी विरोधकांच्या पारड्यात भरभरून मते टाकल्याने भाजपाला मोठा फटका बसल्याचे सांगितले जाते. 'संविधान बचाव' आणि आरक्षण धोक्यात असल्याचा महाविकास आघाडीचा मुद्दा भाजपाला खोडून काढण्यात अपयश आले होते. यादरम्यान लोकसभेतील पिछेहाटीनंतर भाजपाने आता आपली रणनीती बदलण्यात सुरुवात केली आहे. आंबेडकरवादी समुदायाव्यतिरिक्त असलेल्या इतर दलित घटकांना विशेषतः मातंग समाजाला आपल्याकडे वळवण्याचे भाजपाचे प्रयत्न आहेत.एकंदरीत अनुसूचित जातीच्या आरक्षण उपवर्गीकरणाचा विषय राज्यात लवकरच मार्गी लागण्याची शक्यता आहे. मंत्रिमंडळ बैठकीमध्ये हा विषय सादर झाल्यानंतर शिंदे सेनेचे सामाजिक न्याय व विशेष साह्य मंत्री संजय शिरसाट यांनी त्यावर अनेक प्रश्न उपस्थित केले. उपवर्गीकरणासंदर्भात राबविण्यात येत असलेल्या प्रक्रियेबाबत समाजात संतप्त भावना आहेत, अशी भूमिका शिरसाट यांनी मांडली आहे. त्यावर सांस्कृतिक कार्यमंत्री आशीष शेलार यांनी हे उपवर्गीकरण सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार होत आहे, असा प्रतिवाद केला आहे. भाजपाच्या या प्रस्तावाला आंबेडकरवादी संघटना आणि वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनीही कडाडून विरोध केला आहे. अनुसूचित जातीच्या आरक्षण उपवर्गीकरणामुळे दलित समाजात फूट पडेल आणि त्यांची सामूहिक राजकीय ताकद कमकुवत होईल, असा दावा प्रकाश आंबेडकर यांनी केला आहे. हे धोरण आरक्षणाच्या मूळ तत्त्वाच्या विरोधात असल्याचेही त्यांनी म्हटले आहे. यादरम्यान भाजपाच्या या निर्णयामुळे आगामी काळात राज्यातील दलित मतांचे ध्रुवीकरण होणार की सामाजिक न्यायाची नवी दिशा मिळणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

-----------------------------------

दिलेल्या शेतकऱ्यांनी पुन्हा शेती गमावण्यास तीव्र विरोध दर्शवला. आमच्या उपजीविकेचे काय? असा सवाल करत त्यांनी आंदोलन छेडले. दरम्यान, परभणी तालुक्यातील सहजपूर, जवळा, अमडापूर तसेच सोनपेठ तालुक्यातील कोठाळा येथे पोलिस बंदोबस्तात संयुक्त मोजणी करण्याचा प्रयत्न करण्यात आला. मात्र, यावेळी शेतकरी व प्रशासन यांच्यात तणाव निर्माण झाला. काही ठिकाणी शेतकऱ्यांना जबरदस्तीने हटविण्याचे प्रकार घडले. महिलांशीही अयोग्य वर्तन झाल्याच्या आरोपांमुळे संताप आणखी वाढला.यानंतर आंदोलन अधिक तीव्र झाले. प्रशासनाने शेतकऱ्यांसोबत अनेक बैठका घेतल्या. मात्र, शेतकरी आपल्या भूमिकेवर ठाम राहिले. अखेर जिल्हा प्रशासनाने हा अहवाल शासनाकडे पाठवला आणि शासनाने जिल्ह्यातील महामार्गाची आखणी बदलण्याचा निर्णय घेतला.दरम्यान, मराठवाड्यातील बीड व लातूर जिल्ह्यांतील मूळ आखणी कायम ठेवण्यात येणार असून, नांदेड, हिंगोली, धाराशिव आणि परभणी या जिल्ह्यांमध्ये सुधारित मार्ग निश्चित केला जाणार आहे. त्यामुळे आता नव्या मार्गाबाबत उत्सुकता निर्माण झाली असली, तरी इतर भागातील शेतकर्‍यांतही चिंतेचे वातावरण आहे.शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे परभणीचे खासदार संजय जाधव यांनीही शेतकर्‍यांच्या या लढ्यात सहभागी होत बळजबरीने शेतकर्‍यांची जमीन घेता येणार नाही, असा आक्रमक पावित्रा घेतला होता. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीतही शेतकऱ्यांनी शक्तीपीठ महामार्गासाठी एक इंचही जमीन देणार नाही, असे स्पष्ट सुनावले होते.विधिमंडळाचे अर्थसंकल्पी अधिवेशन सुरु होण्याआधी परभणीत आंदोलनाच भडका उडाला असल्याने परभणीच्या पालकमंत्री मेघना बोर्डीकर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना जमीन मोजणीस स्थगिती देण्याची मागणी केली होती. तेव्हा या मोजणीला तात्पुरती स्थगिती देण्यात आली होती. त्यानंतर आता काही प्रमाणात शक्तीपीठ महामार्गाच्या आखणीतच बदल केला आहे.

--------------------------------

सभागृहात आज शुक्रवार दि. 3 एप्रिल रोजी महादेव कोळी व मल्हार कोळी जमात बांधवांची व्यापक बैठक उत्साहात संपन्न झाली. या बैठकीत विभागातील सर्व जिल्हा व तालुका स्तरावरील प्रमुख पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. प्रारंभी महर्षी वाल्मिक ऋषी, छत्रपती शिवाजी महाराज, बिरसा मुंडा, राघोजी भांगरे, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदींच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. बैठकीच्या अध्यक्षस्थानी जेष्ठ नेते नंदकिशोर बळवंत होते. कोळी महादेव समाजाचे नेते रमेश पिट्टलवाड यांनी प्रास्ताविक करून बैठकीची पार्श्वभूमी विषद केली. मराठवाड्याच्या विविध जिल्ह्यातून आलेल्या समाजाच्या नेत्यांनी आपापली भूमिका मांडून मागण्या पदरात पाडून घेण्यासाठी लोकशाही मार्गाने पण तीव्र आंदोलन करण्याची गरज असल्याचे सांगितले. आंदोलनाचे स्वरुप आणि रुपरेषा लवकरच जाहीर करण्यात येणार असून यासाठी वर कमिटी स्थापन करण्याचाही निर्णय या बैठकीत घेण्यात आला यावेळी महादेव कोळी, मल्हार कोळी समाजाचे मराठवाड्यातून निवडून आलेले जि.प., पं.स., म.न.पा. व न.प. सदस्य आणि वेगवेगळ्या क्षेत्रात भरीव कामगिरी करणाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. मराठवाड्यातील जात पडताळणी समित्याकडून महादेव कोळी, मल्हार कोळी जमातींना 2011 पूर्वी नियमित वैधता प्रमाणपत्रे दिली जात होती. ती पूर्ववत मिळावीत अशी एकमुखी मागणी करण्याचे ठरले. महादेव कोळी-मल्हार कोळी जात प्रमाणपत्रासाठी विशेष कॅम्पचे आयोजन करण्याचीही मागणी यावेळी लावून धरण्यात आला आहे. या बैठकीत सर्वश्री ॲड. सुनील बळवंते, डी. एन. कोळी, व्यंकटराव मूदीराज, शंकर तमवाड, ॲड. सुनील सपकाळ, रत्नाकर पाडळे, पंढरीनाथ कोने, चंद्रहास नलमले, रामभाऊ काळगे, हनुमंत मामीलवाड, शिवशंकर फुले, शंकर मनाळकर, निवृत्ती रेखडगेवार, चंद्रकांत घोडके, सौ. रेणुका घोरपडे, ॲड. ओमगशद बोईनवाड, माधव बुधवारे, जि. प. सदस्य आश्विन नागराळे, गट विकास अधिकारी कैलास बळवंत आदींची व्यासपीठावर उपस्थिती होत बैठक यशस्वी करण्यासाठी सर्वश्री राजेभाऊ बळवंत, शंकर गंगाधरे, महादेव कंडुकटले, अंगद गंगाधरे, विनोद बळवंत, ज्ञानोबा सुरवसे, अजय बळवंत, दिलीप तलवारे, संदीप लांडगे, पवन बळवंत, श्याम गंगाधरे, राम वाघमारे, किरण विभुते, राजेश विभुते, राजू तोरडमल, हरीकिशन बहिरे, आकाश बळवंत, साईनाथ विभुते, गजानन गंगाधरे, संतोष लांडगे यांच्यासह महादेव कोळी, मल्हार कोळी जमात बांधवांनी परिश्रम घेतले.

-----------------------------------------

आला आहेअमरावतीचे पोलीस अधीक्षक विशाल आनंद यांनी शुक्रवारी सकाळी आयोजित पत्रकार परिषदेत या प्रकरणाची अधिकृत माहिती दिली. प्राप्त तक्रारीनुसार, डिसेंबर महिन्यात बच्चू कडू यांच्या 'कुरळपूर्णा' येथील निवासस्थानी एक बैठक पार पडली होती. या बैठकीत बच्चू कडू, शुभम उर्फ गोलू माहोरे आणि एका अनोळखी इसमाने मिळून अभिजीत तायडे यांना अपघातात ठार मारण्याबाबत चर्चा केली होती. या संभाषणाचे रेकॉर्डिंग एका गोपनीय साक्षीदाराने आपल्या मोबाईलमध्ये केले होते, जे आता पोलिसांकडे सुपूर्द करण्यात आले आहेचांदूरबाजार पोलिसांनी याप्रकरणी फौजदारी स्वरुपाचा कट रचल्याप्रकरणी माजी आमदार बच्चू कडू (56, रा.कुरळपूर्ण) गोलू माहोरे (50) - रा. आशेगाव. एक अनोळखी इसम यांच्याविरुद्ध फौजदारी स्वरुपाचा कट रचल्याचा गुन्हा दाखल केला आहे..तक्रारदार अभिजीत तायडे यांनी संभाषणाची रेकॉर्डिंग असलेला पेन ड्राईव्ह पोलिसांना दिला आहे. पोलीस अधीक्षक विशाल आनंद यांनी स्पष्ट केले की प्रथमदर्शनी रेकॉर्डिंगमधील तथ्य लक्षात घेऊन गुन्हा दाखल करण्यात आला आहे. संभाषणाची सत्यता पडताळण्यासाठी ते न्याय वैद्यकीय प्रयोगशाळेकडे पाठवण्यात येणार आहे. ज्या मोबाईलमध्ये हे रेकॉर्डिंग झाले, तो ओरिजनल डिव्हाइस जप्त करून फॉरेन्सिक तपासासाठी पाठवला जाईल. आमचे आमदार बंधू प्रवीण तायडे आणि त्यांच्या निकटवर्तीयांच्या जीविताला धोका आहे, त्यामुळे संबंधित आरोपींवर कठोर कारवाई करण्यात यावी," अशी मागणी अभिजीत तायडे यांनी आपल्या तक्रारीतून केली आहे.अचलपूर मतदारसंघात बच्चू कडू आणि प्रवीण तायडे यांच्यातील राजकीय वैमनस्य सर्वश्रुत आहे. बच्चू कडू यांनी सलग चार वेळा या मतदारसंघाचे प्रतिनिधित्व केले होते. मात्र, 2024 च्या विधानसभा निवडणुकीत भाजपचे प्रवीण तायडे यांनी त्यांचा पराभव केला. या पराभवानंतर दोन्ही गटांतील संघर्ष आता टोकाला गेल्याचे चित्र दिसत आहे.या हायप्रोफाईल गुन्ह्यामुळे अचलपूर आणि चांदूरबाजार परिसरात तणावाचे वातावरण निर्माण होण्याची शक्यता आहे. कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती बिघडू नये, यासाठी अमरावती ग्रामीण पोलिसांनी ठिकठिकाणी चोख पोलीस बंदोबस्त तैनात केला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस प्रशासन अत्यंत गांभीर्याने करत असून, फॉरेन्सिक रिपोर्टनंतर अनेक मोठे खुलासे होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

---------------------------------------------

श्रीफळ फोडून करण्यात आला. या कार्यक्रमास परिसरातील ज्येष्ठ नागरिकांसह अनेक मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. या प्रसंगी माजी नगराध्यक्ष बाजीराव धर्माधिकारी, नगर परिषद बांधकाम सभापती प्रा. पवन मुंडे, माजी उपनगराध्यक्ष तथा नगरसेवक राजाभैय्या पांडे, जयराज देशमुख, नितीन बागवाले आदी उपस्थित होते.दरम्यान, पुलाचे काम दर्जेदार व वेळेत पूर्ण व्हावे यासाठी प्रशासनाला सूचना देण्यात आल्या. तसेच कामात पारदर्शकता राखण्यासाठी पुलाचे थ्री-डी स्टील डिझाईन, मंजूर निधी व कामाचा कालावधी दर्शविणारा माहिती फलक उभारण्याचे निर्देशही नगर अभियंत्यांना देण्यात आले आहेत. नव्या पुलामुळे अंबेवेस परिसरातील वाहतूक अधिक सुरक्षित व सुलभ होणार असून, हा पूल विकासाचा नवा दुवा ठरणार असल्याची भावना नागरिकांकडून व्यक्त होत आहे.पुलाचे काम दर्जेदार व वेळेत पूर्ण व्हावे यासाठी नगर परिषद प्रयत्न करेल.अशी ग्वाही नगराध्यक्षा सौ पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी व सर्व न. प. पदाधिकारी यांनी दिली आहे.

-----------------------------------------

राज्यातील शासकीय शाळा, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळा, खासगी अनुदानित शाळांतील विद्यार्थ्यांसाठी नियतकालिक मूल्यांकन चाचणी घेतली जाणार आहे. त्यासाठी प्रसिद्ध करण्यात आलेल्या वेळापत्रकानुसार दुसरी ते आठवी या इयत्तांची 11 एप्रिल, 15 एप्रिल आणि 22 एप्रिल रोजी अनुक्रमे प्रथम भाषा, गणित आणि तृतीय भाषा या विषयाची परीक्षा घेतली जाणार आहे. याच काळात आता शाळांमध्ये पटपडताळणी प्रक्रियाही राबवली जाणार आहे.

या पार्श्वभूमीवर परिपत्रकाद्वारे दिलेल्या सूचनांनुसार, इयत्ता दुसरी ते आठवीच्या वर्गाची पटपडताळणी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेने आयोजित केलेल्या पॅट परीक्षेच्या दिवशी म्हणजेच 11 एप्रिल, 15 एप्रिल, 22 एप्रिल रोजी करावी. इयत्ता नववीची मराठी, गणित आणि इंग्रजी या विषयांची वार्षिक परीक्षा 11 एप्रिल, 15 एप्रिल, 22 एप्रिल रोजी आयोजित करावी. इयत्ता अकरावीची मराठी, भौतिकशास्त्र, इंग्रजी या विषयांची वार्षिक परीक्षाही याच दिवशी आयोजित करण्याबाबत स्पष्ट करण्यात आले आहे.राज्यातील शाळा पटपडताळणीच्या अनुषंगाने 'स्टुडंट पोर्टल'वर मुख्याध्यापक लॉगिन, केंद्रप्रमुख लॉगिन, विस्तार अधिकारी लॉगिन, शिक्षणाधिकारी लॉगिनवर सुविधा उपलब्ध करून दिली जाणार आहे. पटपडताळणीसाठी शाळेला भेट देणारे पथक या लॉगिनचा वापर करून उपस्थित आणि अनुपस्थित विद्यार्थ्यांची नोंद करतील.इयत्ता दहावी, इयत्ता बारावीच्या विद्यार्थ्यांची पटपडताळणी करण्याची आवश्यकता नाही. राज्य मंडळाच्या परीक्षेतील विद्यार्थी उपस्थिती ग्राह्य धरली जाणार असल्याचे पत्रात नमूद करण्यात आले आहे.

----------------------------------------

कायद्यानुसार गुन्हा नोंद करण्यात आला आहे. तपासा दरम्यान पोलिसांनी आरोपींकडून 3 लाख रुपये रोख जप्त केले असून, आणखी 3.20 लाख रुपये विविध बँक खात्यांमध्ये गोठवले आहेत. आरोपी फसवणुकीतून मिळालेली रक्कम ऑनलाइन ट्रेडिंगच्या माध्यमातून स्वतःच्या फायद्यासाठी वापरत असल्याचेही निष्पन्न झाले आहे.सायबर पोलिसांनी तांत्रिक विश्लेषण व डिजिटल पुराव्यांच्या आधारे आरोपींचा माग काढत जळगाव येथून त्यांना अटक केली. अटक करण्यात आलेल्या आरोपींमध्ये प्रसन्न अजय कासट (वय 31),स्वाती प्रसन्न कासट (वय 26), संकेत दीपक बेलदार (वय 22) यांचा समावेश आहे. या प्रकरणात आणखी काही आरोपी सहभागी आहेत का, तसेच इतर किती नागरिकांची फसवणूक झाली आहे, याचा सखोल तपास सध्या सुरू आहे. दरम्यान, बीड जिल्हा पोलिसांनी नागरिकांना आवाहन केले आहे की, "डिजिटल अरेस्ट"सारख्या खोट्या धमक्यांना बळी पडू नये. पोलीस कधीही व्हिडिओ कॉलद्वारे अटक करत नाहीत. अशा प्रकारचे कॉल आल्यास त्वरित 1930 या सायबर हेल्पलाईन क्रमांकावर संपर्क साधून तक्रार नोंदवावी. ही कारवाई पोलीस अधीक्षक, बीड यांच्या मार्गदर्शनाखाली सायबर पोलीस पथकाने यशस्वीपणे पार पाडली.

-------------------------------

कोणासोबत झाला आहे तर तो कुटुंबातील सदस्या आहे आणि त्यानंतर रुपाली चाकणकर यांच्यासोबत आहे. रुपाली चाकणकर यांचे एकूण 177 कॉल खरातला झाले आहे. तर त्यांची बहीण प्रतिभा चाकणकर यांचे 236 कॉल आहेत. 33 हजार पेक्षा जास्त सेकंड रुपाली चाकणकर यांच्यासोबत सोबत बोलणं झालं आहे.'

## पान 4 वरुन

लक्ष देत नसल्याचा आरोप नागरिक करत आहेत.यामुळे नागरिकांनी तीव्र नाराजी व्यक्त करत, पाणीपुरवठा तात्काळ सुरळीत करण्याची मागणी केली आहे. तसेच किमान चार दिवसांतून एकदा नियमित पाणीपुरवठा करण्यात यावा, अशी मागणीही जोर धरत आहे. याशिवाय, सर्व विकासकामांची प्रत्यक्ष पाहणी करून दर्जेदार कामे करून घेण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.एकंदरीत, तीन पाणी योजना अस्तित्वात असूनही नियोजनाच्या अभावामुळे धारूर शहरात पाणीटंचाईची तीव्र समस्या कायम असून, प्रशासनाने तातडीने यावर उपाययोजना करणे गरजेचे असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. पाणीपट्टी साठी जशी नागरिकांची आढळून करतात त्याप्रमाणेच पाणीपुरवठा सुरळीत करावा अशी मागणी महिला वर्गाकडून होत आहे

----------------------------

अशी शंका उपस्थित होत आहे. कारण शेतकऱ्यांची सद्याची रब्बीची पिके गहू, ज्वारी तसेच टरबूज, खरबूज आणि अंगूर बागा व आंबा यासारखी फळपिके उभी असताना हा अवकाळी पाऊस मोठ्या प्रमाणात बरसत आहे. त्यामुळे अनेक शेतकरी या पिकांमध्ये नुकसानीला सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे उभ्या असणाऱ्या आणि अवकाळी पावसाने कायमची झोपी घातलेल्या पिकांची सरकारने पंचनामे करून त्यांना मदत करण्याची मागणी शेतकरी वर्गातून होत आहे.

--------------------------------

दरम्यान, कारागृहातून सुटल्यानंतर सतीश भोसले आपल्या शिरूर कासार येथील घरी गेला. यावेळी वनविभागाने अतिक्रमण कारवाईत त्याचे घर पाडल्यामुळे उध्वस्त झालेला संसार पाहून तो म्हणाला, एका वर्षात माझ्या आयुष्याची पूर्ण कमाई संपली, मी पूर्णपणे बरबाद झालो आहे. आज माझे संपूर्ण कुटुंब रस्त्यावर आहे. घरातील लेकराबाळांना आणि आई-वडिलांना राहायला छत नाही.

सतीश भोसले हा सोशल मीडियावरील रील्समुळेही चर्चेत आला होता. गाडीच्या डॅशबोर्डवर पैशांची बंडल दाखवणे, हेलिकॉप्टरमधून एन्ट्री आणि पंचतारांकित हॉटेलमधील आलिशान जीवनशैली असे अनेक व्हिडिओ व्हायरल झाले होते.

-----------------------------------

खेळताना रंगेहात मिळून आले.

पोलिसांनी या कारवाईत मोहम्मद खतीब (वय 50, रा. खतिब गल्ली), सद्दाम बागवान (वय 30, रा. बागवान गल्ली), शेख अजहर जिलानी (वय 48, रा. खतिब गल्ली), श्रीराम बारगजे (वय 39, रा. रायगडनगर), नागनाथ ढगे (वय 22, रा. रायगडनगर) आणि धर्मराज वाघमारे (वय 39, रा. मोरेवाडी) यांना ताब्यात घेतले आहे. आरोपींच्या ताब्यातून पोलिसांनी 11 हजार 670 रुपये रोख, 1 लाख 37 हजार रुपये किमतीचे मोबाईल फोन आणि 3 लाख 25 हजार रुपये किमतीच्या मोटारसायकल, असा एकूण 4 लाख 73 हजार 670 रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या प्रकरणी अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक 125/2026 नुसार, महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायदा कलम 12 (अ) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.ही कारवाई बीडचे पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक चेतना तिडके, सहाय्यक पोलीस अधीक्षक ऋषीकेश शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक शरद जोगदंड, पोउपनि आनंद शिंदे व त्यांच्या पथकाने यशस्वी केली. या घटनेचा पुढील तपास पोलीस हवालदार विजयसिंग गायकवाड करत आहेत.

------------------------------------

या कार्यक्रमात श्री गादेकर यांना पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या उपमहापौर शर्मिला बाबर, छत्रपती संभाजीनगरचे उपजिल्हाधिकारी शुभम पवार, पुणे जिल्हा परिषदेचे माध्यमिक शिक्षणाधिकारी डॉ.भाऊसाहेब कोकरे, शिक्षण मंडळाचे सभापती नानासाहेब शिंदे, ध्येय एज्युकेशन फाउंडेशनचे अध्यक्ष सुदाम शेंडगे, दत्तात्रय वारे यांच्या प्रमुख उपस्थितीत आदर्श शिक्षक पुरस्कार देवून गौरविण्यात आले.

शाल, श्रीफळ, स्मृतिचिन्ह, गौरवपत्र असे या पुरस्काराचे स्वरुप आहे. या पुरस्काराबद्दल श्री गादेकर यांचे शाळेचे मुख्याध्यापक दशरथ सावंत, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष संतोष सोळंके व सदस्य तसेच के.एस.रोजेवाले, व्ही.एल.गुट्टे, श्रीमती कटकमवार, ए.टी.जाधव आदी शिक्षकांसह पालक व मित्र परिवारांनी अभिनंदन केले आहे.(पूर्ण)

----------------------------------

केजीच्या विद्यार्थ्यांनी शानदार एंट्री करत उपस्थितांची मने जिंकली. त्यांना ग्रॅज्युएशन प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली. पुढे त्यांनी आकर्षक नृत्य सादर करून सर्वांना मंत्रमुग्ध केले आणि त्यानंतर आपल्या शाळेबद्दलचे प्रेम व्यक्त करत मनोगत सादर केले. छोट्या-छोट्या मुलांच्या आत्मविश्वासपूर्ण सादरीकरणांनी संपूर्ण वातावरण भारावून गेले.

उपस्थित पालकांनी देखील आपले अनुभव आणि भावना व्यक्त करत मुलांच्या प्रगतीबद्दल समाधान व्यक्त केले. सर्व पालकांनी दिलेले सकारात्मक फीडबॅक हा कार्यक्रमाचा विशेष ठरला.

यावेळी संचालिका पूजा सारडा मॅडम यांनी आपल्या भाषणात विशेष भावना व्यक्त केल्या. त्यांनी सांगितले की, सिनियर केजीचे विद्यार्थी गेली तीन वर्षे या विद्यालयात शिक्षण घेत असून त्यांच्याशी एक वेगळाच जिव्हाळ्याचा संबंध निर्माण झाला आहे. हेच विद्यार्थी भविष्यात शाळेची ओळख बनतील, जिथे जिथे जातील तिथे युनीक क्युरिअस किड्सचे नाव अभिमानाने पुढे नेतील, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी आशीर्वाद आणि शुभेच्छा देत त्यांनी त्यांना भावनिक निरोप दिला.

कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थ्यांची क्लास टीचर सुहासिनी मॅडम यांनी आभार प्रदर्शन करत लहानग्या विद्यार्थ्यांशी असलेले आपले भावनिक नाते अत्यंत हृदयस्पर्शी शब्दांत व्यक्त केले, ज्यामुळे उपस्थितांचे डोळे पाणावले.

तसेच या संपूर्ण कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनामध्ये सर्व शिक्षकांचा सक्रिय सहभाग आणि नॉन-टीचिंग स्टाफचे सहकार्य मोलाचे ठरले. त्यांच्या संयुक्त प्रयत्नांमुळे हा सोहळा अत्यंत सुरळीत आणि उत्कृष्ट पद्धतीने पार पडला.

एकूणच, हा ग्रॅज्युएशन डे सोहळा उत्साह, आनंद आणि भावनांनी भरलेला असा संस्मरणीय कार्यक्रम ठरला.

------------------------------

नवीन कार्यालयीन इमारतीमुळे नागरिकांना अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध होणार असून कामकाज अधिक सुलभ व जलद गतीने होण्यास मदत होणार आहे.

नागरिकांनी याची नोंद घेऊन पुढील सर्व कामकाजासाठी लोखंडी सावरगाव येथील नवीन कार्यालयाचा उपयोग करावा, असेही आवाहन करण्यात आले आहे.

-------------------------------------------

लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. याप्रकरणी विलास गव्हाणे (रा. टाकळगाव) व इतर चार अज्ञात व्यक्तींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस कर्मचारी पिंपळे हे करीत आहेत.

----------------------------------------

करण्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी उत्सव समितीच्या अध्यक्षपदी शहराध्यक्ष सतीश नरवडे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.

या प्रसंगी संघटनेचे वरिष्ठ नेते दिनकर दादा ओंकार, मिलीभाऊ दाभाडे, संतोष भिंगारे, शांतीलाल, सचिन शिरसाठ, शांतीलाल गायकवाड, भाऊसाहेब नवगीरे, कैलास जुंबडे, विनोद कोरके, प्रेम चव्हाण, धनंजय रायबोले आदी पदाधिकारी उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी बैठकीस मार्गदर्शन करत जयंती उत्सव यशस्वी करण्यासाठी सर्वांनी एकजुटीने काम करण्याचे आवाहन केले.

यावेळी समितीची उर्वरित कार्यकारिणीही जाहीर करण्यात आली असून, उपाध्यक्षपदी गौतम जमधडे व सुनील काकडे, स्वागताध्यक्षपदी मधुकर नगराळे, कार्याध्यक्षपदी अल्केश कोरके, सचिवपदी स्वप्निल नरवडे, सहसचिवपदी संदीप कांबळे, कोषाध्यक्षपदी सिद्धार्थ तेजाळ व विशंभर भालेराव, तर प्रसिद्धीप्रमुखपदी अनिरुद्ध काळे व संघर्ष मोकळे यांची निवड करण्यात आली.

भिमशक्ती संघटनेच्या वतीने येत्या 14 एप्रिलपर्यंत विविध सामाजिक, सांस्कृतिक व जनजागृतीपर कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

------------------------------------------

दिसून आले. विशेष म्हणजे ती बसमध्ये न चढता तेथून निघून गेल्याचेही आढळले.

या धागेदोऱ्यावरुन स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस उपनिरीक्षक महेश विघ्ने यांच्या पथकाने तपास सुरु केला. जिल्हा पोलिस अधीक्षक नवनीत काँवत, अप्पर पोलिस अधीक्षक चेतना तिडके आणि पोलिस निरीक्षक शिवाजी बंटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने गोपनीय माहितीच्या आधारे बीड येथील माऊली नगर परिसरातून संशयित महिलेला ताब्यात घेतले. तिच्याकडून चोरीस गेलेले मिनी गंठणही जप्त करण्यात आले असून तिला पुढील कारवाईसाठी केज पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

दरम्यान, अटक करण्यात आलेली महिला सराईत चोर असल्याचे समोर आले असून तिच्याविरुद्ध विविध पोलिस ठाण्यांमध्ये गुन्हे नोंद आहेत. तिच्या अटकेमुळे आणखी काही चोरीच्या घटनांची उकल होण्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे.

-------------------------------------------------

या स्पर्धेत जिल्हाभरातून सुमारे हजारो विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. विद्यार्थ्यांमध्ये वाचन संस्कृती रुजवणे तसेच चिकित्सक अभ्यासाची वृत्ती विकसित करणे हा या स्पर्धेचा मुख्य उद्देश असल्याचे आयोजकांनी सांगितले.

स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी जिल्हा स्तरावर प्रा. शशिकांत जावळे, आयु. प्रणित सरवदे, आयु. सुमेध जोगदंड, प्राचार्य प्रदीप गाडे, आयु. भारत मगर, आयु. प्रवीण तरकसे, ॲड. राजेश शिंदे, आयु. महादेव इनकर, प्रा. अशोक गायकवाड यांनी उत्कृष्ट नियोजन केले.

तसेच तालुका समन्वयकांच्या माध्यमातून सर्व तालुक्यांत परीक्षा सुरळीत पार पडली. यामध्ये शिरूर (अनिता लाटे, जयेंद्र निकम), आष्टी (प्राचार्य रत्नकांत निकाळजे, डॉ. चंद्रकांत साळवे), पाटोदा (प्राचार्य अस्मिता जावळे, पृथ्वीराज जावळे), वडवणी (बाबा जाधव, दीपक वडमारे), धारूर (रुद्र सर, सिरसाठ सर), परळी (गायकवाड सर), केज (दादा गायकवाड), माजलगाव (प्रमोद साळवे, अमोल राऊत), गेवराई (भारत मगर, सदाफुले) तसेच बीड (प्रा. प्रकाश ढोकणे) यांनी मोलाची भूमिका बजावली.

तालुकास्तरावर निवड झालेल्या टॉप-10 विद्यार्थ्यांसाठी जिल्हास्तरीय अंतिम परीक्षा रविवार, दि. 5 एप्रिल 2026 रोजी तुलसी संगणक महाविद्यालय, बीड येथे आयोजित करण्यात आली आहे. पात्र विद्यार्थ्यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

--------------------------------

असेल तेंव्हा त्यांनी मोठ्या हौसेने आणि आनंदाने देविचे मंदिर उभा करून मंदिरामध्ये मातेच्या मुर्तिची प्राणप्रतिष्ठा केली या मंदिरा समोरच सप्ताह सुरु असून या सप्ताहामध्ये पारायण श्रीमद् - भागवत कथा सांगीतले जाते व दररोज रात्री 9 ते 11 या वेळेत नामवंत महाराजांची किर्तन सेवा दिली जाते विशेष दररोज या कालावधीमध्ये सर्वांना भोजन दिले जाते या सप्ताहाचा शेवट दि 9 एप्रिल रोजी काल्याच्या किर्तणाने सांगता समारंभ होणार आहे चिंचपुर या पुर्ण गावाला नगर भोजन या दिवशी दिले जाणार असून किल्ले धारूर शहरासह पंचक्रोशितील नागरिकांनी देखिल या सप्ताहाचा व काल्याच्या किर्तनाचा लाभ घेऊन या महाप्रसादाला आवर्जुन उपस्थित राहावे असे आवाहन श्रीमती - संगीता रामदासजी लांब यांच्या सह लांब कुटुंब तथा परिवाराने केलेले आहे

-------------------------------

वाढते महत्त्व आणि पत्रकारांच्या विविध समस्यांवर सविस्तर चर्चा झाली. अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेच्या राज्यभरात सुरु असलेल्या कामकाजाची माहिती देण्याबरोबरच येत्या 18 आणि 19 एप्रिल 2026 मध्ये उदगीर या ठिकाणी होत असलेल्या अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेच्या 44 वे राष्ट्रीय अधिवेशनचे उद्घाटक म्हणून रितसर निमंत्रण

दैनिक लोकमत समूहाच्या एडिटोरियल बोर्डाचे चेअरमन आणि माजी मंत्री श्री.राजेंद्र दर्डा यांना

मुख्य विश्वस्त श्री.एस.एम.देशमुख यांनी दिले.

यावेळी मराठी पत्रकार परिषदेच्या माध्यमातून सुरु असलेल्या कार्याची माहिती सुद्धा श्री.दर्डा यांना दिली. श्री.राजेंद्र दर्डा यांनीही लोकमतच्या प्रवासातील अनुभव सांगत पत्रकारितेची मूल्ये जपण्यावर भर दिला.

यावेळी मराठी पत्रकार परिषदेचे विश्वस्त शरद पाबळे, डिजिटल मिडिया परिषदेचे प्रदेशाध्यक्ष अनिल वाघमारे, प्रदेश सदस्य जितेंद्र सिरसाट आणि लोकमत कार्यालयातील वरिष्ठ अधिकारी आणि पत्रकार उपस्थित होते. अत्यंत मनमोकळ्या गप्पा आणि खेळीमेळीच्या वातावरणात पार पडलेल्या या भेटीने पत्रकारितेतील ज्येष्ठ आणि मार्गदर्शक नेतृत्वांमधील समन्वय पुन्हा एकदा अधोरेखित केला आहे.

-------------------------------------------

सुरु असलेल्या उपशावर कारवाई करताना पोलिसांनी जेसीबी ताब्यात घेण्यासाठी पाठलाग केला. त्यावेळी जेसीबी मालकाने गावातील लोकांना बोलावून घेतले. जमावाने पोलिसांवर धावून जात अरेरावी केली तसेच सरकारी कामात अडथळा निर्माण केला. या घटनेप्रकरणी पोउपनि अर्जुन गोलवाल यांच्या फिर्यादीवरुन किशोर लक्ष्मण डोईफोडे (वय 22, रा. ईट, ता. बीड), श्रीमंत खांडे, सिद्धेश्वर हाटवटे, संभाजी सिद्धेश्वर हाटवटे, ओम उर्फ आप्पासाहेब तसेच दोन महिलांसह एकूण नऊ जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक राठोड करीत आहेत.

-------------------------------------

# 'तीन पाणी योजनांनंतरही धारूरकरांचा घसा कोरडा' ; नागरिकांची पाण्यासाठी भटकंती सुरुच!

## पाणीपट्टीसाठी अडवणूक... मग पाणीपुरवठा सुरळीत का होत नाही, नागरिकांचा सवाल



धारुर : धारुर शहरासाठी सध्या तीन पाणीपुरवठा योजना सुरु असतानाही नागरिकांना पाण्यासाठी प्रचंड हाल सहन करावे लागत आहेत. विविध कारणांमुळे वारंवार पाणीपुरवठा खंडित होत असून, भर उन्हाळ्यात नागरिकांना पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे. त्यामुळे "तीन योजना असूनही धारुरकरांचा घसा कोरडाच" अशी परिस्थिती निर्माण झाली आहे.

गेल्या दहा वर्षांपासून शहरात पाण्याच्या प्रश्नावर राजकारण सुरु असले, तरी या समस्येचे ठोस निराकरण अद्याप झालेले नाही. पाणीपुरवठ्याचे नियोजन कोलमडले असून, नागरिकांचा संताप दिवसेंदिवस वाढताना दिसत आहे. नगरपालिकेतील स्थितीही चिंताजनक असल्याचे चित्र समोर येत आहे. नगरसेवकांपेक्षा त्यांच्या प्रतिनिधींचीच जास्त हालचाल दिसून येत असून, प्रत्यक्ष कामकाजाकडे दुर्लक्ष होत असल्याची चर्चा आहे. सोशल मीडियावर सक्रिय असलेले काही प्रतिनिधी प्रत्यक्ष पाणी नियोजनात मात्र अपयशी ठरत असल्याची नागरिकांची नाराजी आहे.

दरम्यान, मुख्याधिकारी कार्यालयात वारंवार अनुपस्थित राहत असल्याचीही तक्रार नागरिकांकडून होत आहे. ते नेमके बैठकांसाठी गेले आहेत की रजेवर आहेत, याबाबत स्पष्टता नसल्याने अनेक प्रशासकीय कामे रखडत आहेत. परिणामी, पाणीपुरवठा व स्वच्छता यांसारख्या मूलभूत सेवांवर परिणाम होत आहे.शहरातील विविध विकासकामांवरही प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. नगरपालिकेचे अभियंते प्रत्यक्ष कामाच्या ठिकाणी भेट देत नसल्याची चर्चा असून, त्यामुळे कामाच्या दर्जावर परिणाम होत असल्याचे सांगितले जात आहे.

मुख्याधिकारींच्या निष्क्रियतेमुळे अभियंतेही कामावर पान 3 वर

# अवकाळी पावसाच्या हवामान अंदाजाने उभ्या पिकांची होणार राख रांगोळी !




केज | प्रतिनिधी

बीड जिल्ह्यासह केज तालुक्यात गेल्या तीन-चार दिवसापासून सतत अवकाळी पाऊस पडत असल्याने शेतकर्यांची शेतातील उभी पिके नष्ट होत आहेत. या पिकांची तात्काळ पंचनामे करुन शेतकऱ्यांना योग्य मदतषकरण्याची मागणी शेतकरी सरकारकडे करत आहेत.

शेतकरी म्हटले की सतत संकटावर मात करणारा जगाचा पोशिंदा अशी त्याची ओळख असली तरी जगाचा राजा म्हणून ज्याच्याकडे पाहिले जाते आणि त्याच्यावर ज्यावेळी नैसर्गिक संकट येते त्यावेळेस मात्र सरकार याच बळीराजावर कानाडोळा करत असल्याचे पहावयास मिळते. कारण गेल्या तीन ते चार दिवसापासून बीड जिल्ह्यासह केज तालुक्यात अवकाळी पाऊस मोठ्या प्रमाणात होत आहे आणि यापुढे तीन चार दिवस अवकाळी पाऊस हवामान खात्याने अंदाज वर्तवलेला असल्यामुळे आधीच उभी पिके जमिनीत गाडी जात असताना पुन्हा तीन-चार दिवस अवकाळी पावसाच्या अंदाजाने शेतकरी जमिनीत गाडला जातो की काय ? पान 3 वर

गेल्या तीन चार दिवसापासून केज तालुक्यात कुठे ना कुठे मेघगर्जनेसह अवकाळी पाऊस पडत आहे. यामुळे रब्बीची पिके आणि ईतर पिके जमिनीत गाडली गेली आहे . त्यामुळे प्रशासनाने पंचनामे करुन शेतकर्यांना मदतीचा हात द्यावा.

• -- दिनकर जाधव , शेतकरी

# वर्षभरानंतर सतीश भोसले उर्फ 'खोक्या' तुरुंगाबाहेर; मारहाण प्रकरणात न्यायालयाकडून निर्दोष मुक्तता



भाजप आमदार सुरेश धस यांचा कार्यकर्ता सतीश उर्फ खोक्या भोसले वर्षभरानंतर कारागृहाबाहेर आला आहे. बीड जिल्ह्यातील शिरुर कासार येथे ढाकणे पिता-पुत्र मारहाण प्रकरणात तो मागील वर्षभरापासून कारागृहात होता. यातील एका प्रकरणात न्यायालयाने त्याची निर्दोष मुक्तता केली असून, इतर गुन्ह्यांमध्ये जामीन मंजूर झाल्याने त्याच्या सुटकेचा मार्ग मोकळा झाला आहे. ढाकणे पिता-पुत्र मारहाण प्रकरणाची सुनावणी बीड न्यायालयात पार पडली. पुराव्याअभावी न्यायालयाने सतीश भोसले याला आरोपातून निर्दोष मुक्त केले. बॅटने मारहाण करण्याचे मुख्य प्रकरण अद्याप न्यायप्रविष्ट आहे. मात्र त्या प्रकरणासह इतर गुन्ह्यांमध्येही त्याला जामीन मंजूर करण्यात आला आहे. त्यामुळेच काल सायंकाळी तो कारागृहातून बाहेर आला. निर्दोष मुक्ततेनंतर सतीश भोसले म्हणाला की, सत्याचा विजय झाला आहे. माझ्यावर खोटे आरोप करण्यात आले होते. न्यायालयात सत्य समोर आले आणि माझी निर्दोष मुक्तता झाली. मला न्यायदेवतेवर विश्वास होता. व्हायरल झालेल्या व्हिडिओची सत्यता खोटी होती. मला टार्गेट करून माझ्या कुटुंबावर अन्याय करण्यात आला. पान 3 वर

# अंबाजोगाईत हॉटेलवर पोलिसांचा छापा; 'तिर्रट' जुगाराचा डाव उधळला, 6 जणांना अटक




अंबाजोगाई: शहरातील कारखाना रोडवरील एका हॉटेलमध्ये सुरु असलेल्या जुगार अड्ड्यावर शहर पोलिसांनी गुरुवारी (दि. 2) मोठी कारवाई केली. गुप्त माहितीच्या आधारे टाकलेल्या या छाप्यात सहा जुगारी पोलिसांच्या जाळ्यात अडकले असून, त्यांच्याकडून 4 लाख 73 हजार 670 रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

अंबा सहकारी साखर कारखाना रोडवरील 'हॉटेल' परिसरात काही इसम तिर्रट नावाचा जुगार खेळत असल्याची खात्रीशीर माहिती पोलीस निरीक्षक शरद जोगदंड यांना मिळाली होती. या माहितीवरुन पोलिसांच्या पथकाने सदर हॉटेलवर अचानक छापा टाकला. यावेळी सहा जण गोलाकार बसून पैशांवर पत्त्यांचा जुगार पान 3 वर

# डॉ.प्रमोद गादेकर यांचा राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन गौरव



परळी वैजनाथ, ता.03, (बातमीदार):- परळी परिसरातील निळा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील पदवीधर शिक्षक डॉ.प्रमोद भागवत गादेकर यांना ध्येय एज्युकेशन फाउंडेशन पुणे यांच्या वतीने देण्यात येणारा राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार देवून गौरविण्यात आले आहे.

यापूर्वी श्री गादेकर यांना मराठवाडा साहित्य परिषदेच्या परळी शाखेचा आदर्श शिक्षक पुरस्कार तसेच गंगाखेड येथील धन्वंतरी बहुउद्देशिय संस्थेच्या वतीनेही आदर्श शिक्षक पुरस्कार देवून गौरविण्यात आले होते. ग.दी. माडगुळकर नाट्यगृह निगडी, पुणे येथे गेल्या रविवारी (ता.29) आयोजित करण्यात आलेल्या एका समारंभात ध्येय एज्युकेशन फाउंडेशनच्या आदर्श शिक्षक पुरस्काराचे वितरण करण्यात आले. पान 3 वर

# युनीक क्युरिअस किड्समध्ये ग्रॅज्युएशन डे उत्साहात साजरा




युनीक क्युरिअस किड्स विद्यालयात आज ग्रॅज्युएशन डे सोहळा अत्यंत उत्साहपूर्ण आणि आनंददायी वातावरणात पार पडला. या प्रसंगी सिनियर केजीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ आयोजित करण्यात आला. गेल्या तीन वर्षांपासून या विद्यालयात शिक्षण घेत असलेल्या लहानग्या विद्यार्थ्यांसाठी हा क्षण भावनिक आणि अविस्मरणीय ठरला.

कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून संस्कार शाळेचे प्राचार्य अमर गायकवाड सर, आपेक्स ब्रेन्सच्या संचालिका शीतल पनपालिया मॅडम, विज्ञानिकेतन स्कूलचे संचालक सचिन सारडा सर तसेच युनीक क्युरिअस किड्सच्या संचालिका पूजा सारडा मॅडम उपस्थित होत्या.

या सोहळ्याचे सूत्रसंचालन भक्ती बियानी मॅडम यांनी अत्यंत सुंदर आणि प्रभावी पद्धतीने केले. प्रमुख पाहुणे अमर गायकवाड सर यांनी विद्यार्थ्यांना आणि पालकांना मार्गदर्शन करत त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी प्रेरणादायी विचार मांडले.

यानंतर ग्रॅज्युएशन ड्रेसमध्ये सिनियर पान 3 वर

# उप प्रादेशिक परिवहन कार्यालय अंबाजोगाईचे नवीन इमारतीत स्थलांतर




अंबाजोगाई : उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, अंबाजोगाई हे कार्यालय आता स्वतःच्या मालकीच्या नवीन प्रशासकीय इमारतीमध्ये स्थलांतरित होत आहे.

लातूर – छत्रपती संभाजीनगर महामार्गालगत, स्व. विमलताई मुंदडा आरोग्य संकुल, सेंजारी, मौजे लोखंडी सावरगाव येथे बांधण्यात आलेल्या नवीन कार्यालयीन इमारतीमध्ये उप प्रादेशिक परिवहन कार्यालय अंबाजोगाईचे सर्व कामकाज दि. 06 एप्रिल 2026 पासून सुरु होणार आहे.

त्यामुळे वाहन नोंदणी, वाहन परवाना (ड्रायव्हिंग लायसन्स), परवाने, कर भरणा तसेच इतर सर्व परिवहन कार्यालयाशी संबंधित कामकाजासाठी नागरिकांनी यापुढे लोखंडी सावरगाव येथील नवीन कार्यालयात उपस्थित राहून आपली कामे करून घ्यावीत, असे आवाहन उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, अंबाजोगाई यांनी केले आहे. पान 3 वर

# टाकळगाव येथे किरकोळ कारणावरून मारहाण




गेवराई : तालुक्यातील टाकळगाव परिसरात किरकोळ कारणावरुन झालेल्या वादातून एका व्यक्तीस मारहाण केल्याची घटना बुधवारी (दि. 31) रात्री घडली. या प्रकरणी पाच जणांविरुद्ध गेवराई पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

गेवराई तालुक्यातील आहेर चिंचोली येथील राधेश्याम त्रिंबक मुळे (वय 40) हे टाकळगाव येथील टोलनाक्याजवळ बुधवारी रात्री साडेबारा वाजताच्या सुमारास उपस्थित होते. त्यावेळी काही जणांनी सुपरवायझर महेश शिंपे यांच्याशी वाद घालत शिवीगाळ सुरु केली होती. दरम्यान, राधेश्याम मुळे यांनी वाद थांबविण्याचा प्रयत्न केला असता संबंधितांनी त्यांच्याशीही शिवीगाळ करत पान 3 वर

# युगप्रवर्तक डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या 135 व्या जयंती उत्सव समितीच्या अध्यक्षपदी सतीश नरवडे

## • भिमशक्ती संघटनेची महत्त्वपूर्ण बैठक; विविध कार्यक्रमांचे आयोजन जाहीर



छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी): युगप्रवर्तक डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या 135 व्या जयंतीनिमित्त भव्य उत्सव साजरा करण्यासाठी भिमशक्ती संघटनेच्या वतीने महत्त्वपूर्ण बैठक आयोजित करण्यात आली. ही बैठक भिमशक्तीचे नेते हांडोरे साहेब यांच्या आदेशानुसार जिल्हाध्यक्ष राजू भाऊ मंजुळे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली.

बैठकीत जयंती उत्सव मोठ्या उत्साहात व दिमाखात साजरा पान 3 वर

# केज बसस्थानकावर महिलेच्या गळ्यातील सोन्याचे मिनी गंठण चोरणाऱ्या महिलेला अटक

## • स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई, मुद्देमाल जप्त, चोरीच्या गुन्ह्यांची उकल होणार



केज : लातूर येथे शिक्षण घेत असलेल्या मुलीला भेटण्यासाठी निघालेल्या मंजुश्री जगदाळे या महिला केज बसस्थानकावर थांबल्या असताना गर्दीचा फायदा घेत अज्ञात महिलेने त्यांच्या गळ्यातील सुमारे दीड तोळे वजनाचे सोन्याचे मिनी गंठण लंपास केले होते. ही घटना 19 मार्चरोजी दुपारी घडली होती.

या प्रकरणी मंजुश्री जगदाळे यांनी केज पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. त्यानुसार अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा नोंद करण्यात आला. तपासादरम्यान पोलिसांनी बसस्थानक परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासले असता, एक संशयित महिला त्यांच्या मागे उभी असल्याचे पान 3 वर

# जिल्हास्तरीय सामान्य ज्ञान स्पर्धेची तालुकास्तरीय परीक्षा उत्साहात संपन्न; विद्यार्थ्यांचा मोठ्या प्रमाणात सहभाग



बीड, प्रतिनिधी : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या 135 व्या जयंतीनिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समिती, बीड शहर यांच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही महापुरुषांच्या जीवनकार्यावर आधारित जिल्हास्तरीय सामान्य ज्ञान स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेअंतर्गत तालुकास्तरीय परीक्षा सोमवार, दि. 30 मार्च 2026 रोजी जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमध्ये उत्साहात पार पडली.

तालुका बीडसाठी तुलसी संगणक महाविद्यालय येथे परीक्षा केंद्र निश्चित करण्यात आले होते. यावेळी आयु. मनोज वाघमारे, आयु. सुमेध जोगदंड, अशोक ठोकळ, तानाजी शिनगारे, अभिजीत जाधव आदींच्या प्रमुख उपस्थितीत उद्घाटन समारंभ संपन्न झाला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रास्ताविक प्रा. प्रकाश ढोकणे यांनी केले.

पान 3 वर

# करवीर निवासिनी महालक्ष्मी मातेची शिक्षक कॉलनी धारूर येथे प्राणप्रतिष्ठा मुर्तिची स्थापना व सात दिवस सप्ताहाचे आयोजन



धारूर ( बाबुराव तिडके ) कोल्हापुरच्या धर्तिवर चिंचपुर ता धारूर येथिल दाम्पत्य श्रीमती - संगीता रामदासजी लांब यांनी धारूर शहरातील शिक्षक कॉलणी येथे भव्य असे देखणे गड किल्ल्याचे दगड ( चिरे ) वापरुन माता करवीर निवासिनी लक्ष्मीदेविचे मंदिर उभा केलेले आहे दि 3 एप्रिल वार - शुक्रवार रोजी वेळ - 11 : 47 या मुहुर्तावर पूर्ण विधी पार पाडून ह भ प - आशिष ( महाराज ) धारूरकर यांच्या हस्ते होम - पुजन - मंत्रोउच्चारांच्या जयघोषामध्ये मंदिरामध्ये माता करवीर निवासिनी महालक्ष्मी देविची प्राणप्रतिष्ठा मुर्ति बसऊन मंदिरावर कलश बसविण्यात आला करवीर निवासिनी महालक्ष्मी मातेच्या आशिर्वादाचा संचार लांब परिवारामध्ये आहे श्रीमती - संगीता लांब यांच्या कुटुंबामध्ये सर्व काही धनलक्ष्मी आहे या दांम्पत्याला माता महालक्ष्मी देविनेच बुद्धी दिली पान 3 वर

# दैनिक लोकमत समुहाचे राजेंद्र दर्डा आणि अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस.एम.देशमुख यांची छत्रपती संभाजीनगरमध्ये सदिच्छा भेट

## - राष्ट्रीय अधिवेशनाचे दिले निमंत्रण



छत्रपती संभाजीनगर / प्रतिनिधी दैनिक लोकमत समूहाच्या एडिटोरियल बोर्डाचे चेअरमन आणि माजी मंत्री श्री.राजेंद्र दर्डा यांची अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त श्री.एस.एम.देशमुख यांनी आज छत्रपती संभाजीनगर येथील दैनिक लोकमत च्या मुख्य कार्यालयात सदिच्छा भेट घेतली.पत्रकारिता क्षेत्रातील या दोन दिग्गज व्यक्तिमत्त्वांमध्ये झालेल्या या भेटीमुळे माध्यम वर्तुळात चर्चा रंगली आहे. या भेटीदरम्यान उभय नेतृत्वामध्ये पत्रकारितेसमोरील सद्यस्थिती, डिजिटल मीडियाचे पान 3 वर

# वाळूमाफियांकडून पोलिस अधिकाऱ्याला धक्काबुक्की

पिंपळनेर, बीड तालुक्यातील सिंदफना नदी पात्रातून सुरु असलेल्या अवैध वाळू उपसा व वाहतुकीवर कारवाई करण्यासाठी गेलेल्या पोलिसांना अरेरावी करत धक्काबुक्की करण्यात आल्याची घटना खुडूस (ता. बीड) येथे घडली. या प्रकरणी पिंपळनेर पोलिसांनी महिलांसह नऊ जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पिंपळनेर पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक अर्जुन गोलवाल हे आपल्या पथकासह 31 मार्च रोजी रात्री खुडूस येथे गेले असता सिंदफना नदी पात्रातून अवैधरित्या वाळू उपसा करून वाहतूक सुरु असल्याचे निदर्शनास आले. यावेळी हायवा चालकाकडे मालकाची चौकशी केली असता माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी संबंधितांविरुद्ध प्राथमिक कारवाई केली.दरम्यान, वाळूने भरलेला हायवा आणि जेसीबीच्या मदतीने पान 3 वर